अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १७५ । बुधवार ८ एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## सत्य – आत्मसाक्षात्कार झाला पाहिजे

**'सहजयोग' भाग २०**



जेव्हा सत्याला शोधतो असं म्हणतो तेव्हा एक गोष्ट जाणली पाहिजे की सत्य आहे तिथे आहे ते तुम्ही बदलू शकत नाही. त्याची तुम्ही नुसती कल्पना करू शकत नाही. त्याची तुम्ही रूपरेषा बनवू शकत नाही . सर्वात मुख्य म्हणजे या मानवी जीवनात या मानवी चेतनेत तुम्ही त्याला जाणू शकत नाही. म्हणूनच सर्व शास्त्रांमध्ये, मग ते आपल्या भारतीय लोकांनी लिहिलेले असोत, चायनीज लिहिलेले असोत, कुराणात असोत किंवा कोणत्याही धर्मातले असोत सर्वांनी एकमेव गोष्ट सांगितली की तुमचा पुनर्जन्म झाला पाहिजे. तुमचा आत्म साक्षात्कार झाला पाहिजे. तुम्हाला आत्मबोध झाला पाहिजे. पण आत्मबोध म्हणजे नुसतं काहीतरी बुद्धीने जाणन्या सारखं नसत. पण ते बुद्धीच्या पलीकडचं असं आहे. आणि त्यासाठी फक्त एक तऱ्हेची नम्रता मनुष्यात पाहिजे. या महाराष्ट्रात आपण जन्माला आलो तेव्हा आपणही काहीतरी विशेष असलं पाहिजे पण ते विशेष म्हणजे काय? ते विशेष म्हणजे अध्यात्माची पुण्याई आपण कमवलेली आहे. पूर्व जन्मी आम्ही बहू पुण्य केले ती मंडळी इकडे जन्माला येतात. पण सगळं काही मागच विसरलेले आहेत. जी पुण्याई केली ते विसरलेले आहेत. आणि फक्त आजकालचे जे काही चकमक करणाऱ्या चकचकाट करणाऱ्या ज्या गोष्टी आहेत तिकडे आपलं लक्ष जातंय. आता हे सत्य जाणायच असेल तर ते कस जाणायच? हे जर व्यवस्थित जाणायच असलं तर आधी सहजयोगामध्ये आत्मसाक्षात्कार घेतला पाहिजे. **१९ डिसेंबर १९९१ पब्लिक प्रोग्राम, कोल्हापूर**

## महत्वाचे..

### भोंदूबाबांना निमगुळ गावात बंदी; महिलांचा धडक निर्णय

धुळे : नाशिक येथील भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणानंतर राज्यात संतापाची लाट उसळली असताना, धुळे जिल्ह्यातील निमगुळ गावाने भोंदूबाबा आणि बुवाबाजी करणाऱ्यांना थेट गावबंदीचा निर्णय घेतला आहे. असा निर्णय घेणारे हे राज्यातील पहिले गाव ठरल्याने या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. गावातील महिलांनी एकत्र येत विशेष ठराव मंजूर केला असून, यापुढे कोणत्याही भोंदूबाबाला गावात प्रवेश दिला जाणार नाही, असा निर्धार व्यक्त केला आहे. फसवणूक व शोषण करणाऱ्या भामट्यांना आळा घालण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अस्तित्वात असतानाही काही भोंदूबाबांकडून त्याचा गैरफायदा घेत सामान्य नागरिकांची फसवणूक होत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. विशेषतः अशोक खरात प्रकरणामुळे महिलांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली होती. त्यातूनच निमगुळ गावातील महिलांनी पुढाकार घेत हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

# मुंबई-दिल्लीत 'टॉय कार' बॉम्बने घातपाताचा कट!

## जैश–ए–मोहम्मदशी संबंधित मॉड्यूलचा पर्दाफाश

### ऑनलाईन कट्टरतावाद, किशोरवयीन मुलांचा वापर

### मुंबईतील कुर्ला, खडवलीतून संशयितांना अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मुंबई आणि दिल्ली यांसारख्या महानगरांना हादरवून सोडणारा एक भीषण दहशतवादी कट दिल्ली आणि मुंबई पोलिसांनी संयुक्त कारवाईत उधळून लावला आहे. पाकिस्तानस्थित 'जैश–ए–मोहम्मद'शी संबंधित असलेल्या एका आयएसआयएस–प्रेरित मॉड्यूलचा पर्दाफाश करण्यात आला असून, यामध्ये स्फोटकांसाठी चक्क रिमोट–कंट्रोल खेळण्यांच्या कारचा वापर करण्याचे धक्कादायक तंत्र समोर आले आहे.

सुरक्षा यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित दहशतवादी आयईडी तैनात करण्यासाठी लहान मुलांच्या रिमोट–कंट्रोल गाड्यांचा वापर करण्याच्या तयारीत होते.




कमी खर्चिक पण उच्च परिणामकारक अशा या युक्तीमुळे गर्दीच्या ठिकाणी स्फोटके पोहोचवणे सोपे होते आणि सुरक्षा यंत्रणांची नजर चुकवणेही शक्य होते. मुंबईतील कुर्ला आणि खडवली परिसरातून दोन संशयितांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून खेळणी आणि संशयास्पद डिजिटल साहित्य जप्त करण्यात आले आहे. या तपासातून समोर आलेली सर्वात चिंतेची बाब म्हणजे या दहशतवादी गटाचे पूर्णपणे 'डिजीटल' असणे. अटक करण्यात आलेले मोसाब अहमद उर्फ कलाम, मोहम्मद हमद, कामरान आणि बडा इम्रान हे संशयित टेलिग्रामसारख्या एन्क्रिप्टेड प्लॅटफॉर्मवर सक्रिय होते. (पान ४ वर)

### किशोरवयीन मुले रडारवर

**दहशतवादाच्या या नवीन पॅटर्नमध्ये भरती होणाऱ्यांचे वय अत्यंत कमी आहे. मुंबईतील किमान ४ ते ५ अल्पवयीन मुले सध्या पोलिसांच्या चौकशीच्या फेऱ्यात आहेत. एकाकी पडलेल्या किंवा ओळखीच्या शोधात असलेल्या किशोरवयीन मुलांना आयएसआयएसच्या प्रचाराद्वारे ऑनलाईन जाळ्यात ओढले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

# राज्यात आयटी-एआय विभागाची स्थापना

### मंत्रिमंडळाचे निर्णय:

आयटी आणि एआय विभागामुळे 'डिजिटल गाव' संकल्पनेला गती

कृषी वीज वितरणाचे होणार विभाजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत ग्रामीण महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत दूरगामी आणि दिलासादायक निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये ऊर्जा क्षेत्रातील सुधारणा, आयटी–एआय विभागाची स्वतंत्र स्थापना आणि पश्चिम महाराष्ट्रातील पूरग्रस्तांसाठीच्या विशेष विकास कार्यक्रमाचा समावेश आहे. हे निर्णय कृषी क्षेत्र आणि ग्रामीण पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.

राज्यातील ऊर्जेचा प्रश्न सोडवण्यासाठी महावितरणच्या आर्थिक पुनर्रचनेला मंजुरी देण्यात आली आहे. ग्रामीण भागासाठी सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे 'कृषी वितरण व्यवसायाचे विभाजन' यामुळे शेतीसाठी दिल्या जाणाऱ्या वीज पुरवठ्याचे नियोजन अधिक सुटसुटीत आणि स्वतंत्रपणे करता येईल. महावितरण सुमारे ३२,६७९ कोटी रुपयांचे कर्ज उभारून पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करणार आहे, ज्याचा थेट फायदा ग्रामीण भागातील वीज उपकेंद्र आणि रोहित्रांच्या दुरुस्तीला होईल.

कोल्हापूर, सांगली आणि इचलकरंजीसह संपूर्ण कृष्णा खोऱ्यातील नागरिकांना दरवर्षी पुराचा मोठा फटका बसतो. यावर (पान ४ वर)

**राज्यात आता 'इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता' हा स्वतंत्र मंत्रालयीन विभाग कार्यरत होणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागात डिजिटल गव्हर्नन्स आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढणार आहे. विशेषतः शेतीमध्ये एआय तंत्रज्ञानाचा वापर करून पीक अंदाज, हवामान आणि जलव्यवस्थापन अधिक अचूकपणे करणे शक्य होईल. तसेच स्वतंत्र आयटी संवर्ग निर्माण झाल्याने तालुका पातळीवरही तंत्रज्ञान सेवा गतीने मिळण्यास मदत होईल.**

## डिलिव्हरी कामगारांची कसून पडताळणी बंधनकारक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : ऑनलाइन प्लॅटफॉर्म, गिग आणि डिलिव्हरी क्षेत्रात कार्यरत कामगारांची सखोल पडताळणी करणे अत्यावश्यक असून, ग्राहकांना सुरक्षित व कायदेशीर चौकटीत सेवा मिळावी यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे निर्देश कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिले. मंत्रालयात कामगार व गृह विभागाच्या संयुक्त बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. सध्या नेरीं, डुळससू, इश्रळपझ्ळीं यांसारख्या कंपन्यांकडून डिलिव्हरी पार्टनर्सची नोंदणी प्रामुख्याने ऑनलाइन पद्धतीने केली जाते. त्यानंतर पडताळणीची जबाबदारी थर्ड पार्टी एजन्सीकडे सोपवली जाते. मात्र, या एजन्सींना अधिकार कोणी दिले व त्यांची प्रक्रिया कितपत कायदेशीर आहे, याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

मंत्री फुंडकर यांनी स्पष्ट केले की, संबंधित कंपन्यांनीच कामगारांच्या पार्श्वभूमी तपासाची पूर्ण जबाबदारी घ्यावी. वाहनांचे व्यवसायिक नोंदणी, वैध परवाना, वेतन प्रणाली आदी बाबींचा सर्व विभागांनी संयुक्तपणे अभ्यास करून ठोस आराखडा तयार करावा. (पान ४ वर)

## पत्नी, चिमुकल्या मुलीची हत्या करून पती पोलीस ठाण्यात हजार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**धाराशिव :** पत्नी आणि अवघ्या ८ वर्षांच्या मुलीची वडिलांकडूनच कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. उमरगा तालुक्यातील बेरडवाडी येथील या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत असून बाप–लेकीच्या नात्याला काळिमा फासल्याची भावना व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे आरोपी स्वतःहून पोलिसात हजर होत गुन्ह्याची कबुली दिली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अजित वासुदेव असे आरोपी वडिलांचे नाव असून लिंबाबाई अजित वासुदेव आणि त्यांची ८ वर्षीय मुलगी मानसीची निर्घुण हत्या करण्यात आली आहे. या हत्याकांडांच्या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. मात्र, आरोपी स्वतःहून मुरूम पोलीस ठाण्यात हजर झाला आणि त्याने केलेल्या गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीच्या कबुलीनंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

# अंगणवाडी सेविकांच्या मानधन, प्रोत्साहन भत्त्यासाठी १७४ कोटी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** अंगणवाडी सेविकांच्या मानधन, प्रोत्साहन भत्त्यासाठी आता वाट पाहावी लागणार नाही. मार्च महिन्याच्या मानधन व भत्त्यासाठी सरकारकडून १७४ कोटींचा निधी एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तांकडे वितरीत करण्यात आला आहे.

राज्यात १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी केंद्रांमध्ये सुमारे १ लाख ९ हजार ६५९ अंगणवाडी सेविका आणि १ लाख ६ हजार ७४२ अंगणवाडी मदतनीस कार्यरत आहेत. त्यांना निधी मिळत नसल्याने आर्थिक संघर्ष करावा लागत असल्याची टीका विरोधकांकडून करण्यात येत होती. अंगणवाडी सेविकांना १३००० तर मदतनीसांना ७ हजार ५०० रुपये मानधन दिले जाते. त्यातील केंद्राचा वाटा अनुक्रमे ४५०० व ३५०० रुपये आहे.

या कर्मचाऱ्यांचे मानधन केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे ६० टक्के व ४० टक्के हिस्स्यातून दिले जाते. मात्र केंद्राचा हिस्सा रखडल्याने अंगणवाडी सेविकांची आर्थिक कोंडी झाल्याची टीका करण्यात आली होती. त्याचप्रमाणे या अंगणवाडी सेविकांना अन्य कामांसाठी दिला जाणारा प्रोत्साहन भत्ताही मिळत नसल्याची विरोधकांची टीका होती.

मात्र हा हिस्सा सरकारकडून नियमित दिला जात असल्याचे स्पष्टीकरणही सरकारकडून देण्यात आले होते. सरकारने मार्च महिन्याच्या मानधन व प्रोत्साहन भत्त्यासाठी सरकारकडून निधीचे वितरण करण्यात आले असल्याने अंगणवाडी सेविका व मदतनीसांना दिलासा मिळाला आहे.

■ **केंद्र सरकारचा हिस्सा मिळण्यासाठी एसएनए स्पर्श प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे. या प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करणे व केंद्र शासनाची मंजुरी मिळवणे आवश्यक होते. या परवानगीसाठी राज्य सरकारकडून सर्व तांत्रिक बांबींची पूर्तता करण्यात आली असून केंद्र सरकारची मंजुरीही मिळाली आहे. ही प्रणाली कार्यरत झाल्यामुळे आता केंद्र सरकारचा हिस्साही अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना मिळणार आहे.**

## बौद्ध जात प्रमाणपत्राची फाईल मंत्रालयातून गायब; माहिती अधिकारात सरकारची कबुली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** बौद्ध समाजासाठी लागू करण्यात आलेल्या नमुना क्रमांक ७ च्या जात प्रमाणपत्रासंदर्भातील १९९१ सालची मूळ फाईल मंत्रालयातून गायब झाल्याचे उघड झाले असून, माहिती अधिकाराखाली दिलेल्या उत्तरातून राज्य सरकारनेच याची कबुली दिली आहे. त्यामुळे या प्रकरणावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

केंद्र सरकारने अनुसूचित जातींसाठी नमुना क्रमांक ६ चे एकसमान जात प्रमाणपत्र लागू करण्याचे २० नोव्हेंबर १९९० रोजी आदेश दिले होते. मात्र, महाराष्ट्रात या आदेशाची अंमलबजावणी न करता तत्कालीन उपसचिव एम. एम. कांबळे यांनी २४ सप्टेंबर १९९१ रोजी स्वतंत्रपणे नमुना क्रमांक ७ चे जात प्रमाणपत्र केवळ बौद्धांसाठी लागू केल्याचा आरोप आहे. या निर्णयाला राज्यपाल किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांची मंजुरी नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या संदर्भातील सर्व कागदपत्रांची मागणी 'द बुद्धिस्ट–शेड्यूल्ड कास्ट मिशन ऑफ इंडिया'चे राष्ट्रीय संयोजक अच्युत भोईटे यांनी माहिती अधिकाराखाली केली होती. त्यानंतर अपील प्रक्रियेनंतरही संबंधित फाईल उपलब्ध न झाल्याचे राज्य जन माहिती अधिकारी राहुल मेहेत्रे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या प्रकारामुळे बौद्ध समाजाला अनुसूचित जातींच्या हक्कांपासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप भारतीय बौद्ध महासभेचे कार्यकारी अध्यक्ष भीमराव आंबेडकर यांनी केला आहे. नमुना क्रमांक ७ रद्द करून केंद्राच्या नमुना क्रमांक ६ प्रमाणेच प्रमाणपत्र लागू करण्याची मागणी त्यांनी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्याकडे केली आहे. या प्रकरणी संबंधितांवर कारवाई व धोरणात्मक निर्णयाची जबाबदारी आता प्रशासनावर असल्याचे स्पष्ट होत आहे.

**लैंगिक शोषण प्रकरण**

## अभिषेक कळमकरांविरोधात स्टॅंडिंग अटक वॉरंट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नोकरीच्या आमिषाने विवाहित महिलेचे लैंगिक शोषण केल्या प्रकरणात आरोपी असलेल्या अहिल्यानगरचे माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्याविरोधात न्यायालयाने स्टॅंडिंग अटक वॉरंट जारी केले आहे.



अहिल्यानगर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी हा आदेश दिला असून, यापूर्वी कळमकर यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे. त्यामुळे पोलिसांनी आता वॉरंटच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २५ वर्षीय विवाहित महिलेला शाळेत नोकरी लावण्याचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप कळमकर यांच्यावर आहे. या प्रकरणी २१ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून कळमकर फरार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. दरम्यान, न्यायालयाने स्टॅंडिंग वॉरंट जारी केल्यानंतर पोलिसांच्या कारवाईला वेग आला असून आरोपीला लवकरच अटक करण्यात येईल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

# भोंदू अशोक खरात विरोधात आतापर्यंत १२ गुन्हे दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नाशिक : भोंदू अशोक खरात विरोधात आतापर्यंत १२ गुन्हे दाखल झालेत. त्यातील ११ गुन्ह्यांचा तपास एसआयटी करत आहे. दैवीशक्ती असल्याचं भासवून आरोपी खरात महिलांचे लैंगिक शोषण करायचा. मंदिर परिसरात हातचलाखीचा वापर करून समाजात अंधश्रद्धा पसरवायचा. शिवाय कुटुंबात मृत्यूची भीती दाखवून महिलांना धमकावत असल्याचं समोर आले आहे. या प्रकरणात ३० साक्षीदार, पीडितांची चौकशी सुरू आहे. या महिलांची कुठेही ओळख पटणार नाही याची खबरदारी घेण्याचं आवाहन करत एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी केले.

नाशिक येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते म्हणाल्या की, अशोक खरात प्रकरणात एकूण ११ गुन्ह्यांचा तपास एसआयटी करत आहे. एकूण २४ जणांचे पथक या गुन्ह्यांचा तपास करत आहे. खरातवर अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात मिळून एकूण १२ गुन्हे दाखल झालेत. या १२ पैकी ९ गुन्ह्यांचा तपास एसआयटीकडे आहे. २ गुन्ह्यांचा तपास अहिल्यानगर पोलीस आणि एका गुन्ह्याचा तपास नाशिक पोलीस करत आहेत. एसआयटीकडील गुन्ह्यांपैकी ८ गुन्हे महिला लैंगिक अत्याचाराचे आहेत तर उर्वरीत ३ गुन्हे फसवणूक, अंधश्रद्धाविरोधी कायदा, सावकारी अधिनियम २०१४ याप्रमाणे दाखल आहेत. आजपर्यंतच्या तपासात ३० पेक्षा अधिक साक्षीदारांकडे विचारपूस केली आहे. साक्षीदार, पीडित यांच्याकडे चौकशी केली असता आरोपी पीडित आणि त्यांच्या कुटुंबाच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत होता. त्यांना खडे, चिंचोके, रुद्राक्ष, पूजा विधी या सगळ्या गोष्टींची भीती दाखवत होता आणि यातून पैसा उकळत होता असं त्यांनी सांगितले. तसेच आरोपी अशोक खरात महिलांना दैवीशक्ती असल्याचे भासवत होता. त्यांच्या कुटुंबात मृत्यूची भीती दाखवून आणि बदनामी करण्याची धमकी देऊन महिलांचे लैंगिक शोषण करत होता. त्याचप्रकारे ईशानेश्वर मंदिराच्या परिसरात अंधारात हातचलाखी करून स्वत:कडे दैवीशक्ती असल्याचं सांगत समाजात अंधश्रद्धा पसरवण्याचं काम करत होता. महिला अत्याचाराबाबत पीडित महिला आणि त्यांचे कुटुंब अतिशय धाडसाने समोर आलेत आणि त्यांनी फिर्याद दाखल केल्याने आरोपीवर कायदेशीर कारवाई करू शकत आहे. लोक काय म्हणतील या भीतीने या महिलांनी अन्याय सहन केला आहे. त्यामुळे या महिलांची ओळख पटू न देणे, त्यांचे व्हिडिओ न पसरवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. हायकोर्टानेही तसे निर्देश दिले आहेत. पीडितांची ओळख पटणार नाही ही भूमिका तपास यंत्रणाची आहे. पीडिता आणि त्यांच्या कुटुंबियांच्या मुलाखती घेऊ नये असं आवाहन तेजस्वी सातपुते यांनी केले आहे.

### ४०–४५ दिवसांत दोषारोपपत्र दाखल करणार

**दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित ४ हजाराहून अधिक लिंक्स ड्खढ तपास पथकातील सायबर विभागाने शोधल्या आहेत. सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट पुन्हा पुन्हा टाकणारी ४९१ अकाऊंट कायमचे बंद करण्यात आले आहेत. एसआयटी कडील तपास संवेदनशील असल्याने अधिक माहिती देऊ शकत नाही. १७ मार्च २०२६ रोजी या प्रकरणात पहिला गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे ६० दिवसांत दोषारोपपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामुळे पुढील ४०–४५ दिवसांत ८ गुन्ह्यांचा तपास पूर्ण होईल. पीडितांना मनस्ताप होणार नाही याची समाज म्हणून आपण काळजी घेऊया, असंही तेजस्वी सातपुते यांनी म्हटलं.**

### ■ खरातच्या सहआरोपींवर होणार कारवाई?



**सध्या फिर्यादी आणि साक्षीदार जे सांगतात त्याअनुषंगाने तपास सुरू आहे. सहआरोपी कोण आहे याची चौकशी करून पुढील कार्यवाही केली जाते. मुख्य आरोपी सोडून जर यात कारणीभूत कुणी असेल, कुणी या गुन्ह्यांसाठी मदत केली असेल तर त्याचा तपास सुरू आहे. पुराव्यानिशी जर काही समोर आले तर निश्चित त्यावर कारवाई करण्यात येईल. तपास जसजसा पुढे जाईल सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील. चार्जशीट दाखल होईपर्यंत गोपनीयता बाळगणे गरजेचे आहे असं सांगत तेजस्वी सातपुते यांनी या प्रकरणात सहआरोपी करणार का या प्रश्नाला उत्तर दिले. त्याशिवाय या प्रकरणात ईडीने आर्थिक व्यवहारांबाबत दखल घेतली आहे. भविष्यात ईडीला पूर्णपणे सहकार्य असणार आहे. भविष्यात अंधश्रद्धेपोटी महिलांचे शोषण घडू नये यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे. या प्रकरणात कुणीही अल्पवयीन नाही. सीडीआर बाबतीत शासन स्तरावर चौकशी होत आहे. त्यात जे काही निष्पन्न होईल ते आपल्या समोर येईल अशी माहितीही तेजस्वी सातपुते यांनी दिली आहे.**

## संपादकीय

# ‘विद्येचे मंदिर’ ‘नफ्याचे दुकान’ होऊ नये

शिक्षण ही कोणत्याही प्रगत समाजाची पायाभरणी असते. मात्र, आजच्या काळात महाराष्ट्रासह देशातील महानगरांमध्ये शिक्षणाचे स्वरूप बदलून ते एका नफेखोर उद्योगात रूपांतरित झाले आहे. सरकारने वेळीच हस्तक्षेप करून या 'शिक्षण माफिया' आणि विक्रेत्यांच्या अभद्र युतीला लगाम घातला नाही, तर सामान्य पालकांची पिळवणूक थांबणे केवळ अशक्य आहे.

चालू शैक्षणिक वर्ष संपत आहे. आगामी शैक्षणिक वर्षाची चाहूल लागली असताना ते सुरू होण्यापूर्वीच अहिल्यानगरच्या श्रीरामपूर तालुक्यातील एका शिक्षण संस्थेने पुढच्या वर्षीची फी भरण्यासाठी आतापासूनच सक्ती केली आहे. याविरुद्ध काही जागरूक पालकांनी आवाज उठवला. शासन आणि संबंधित यंत्रणा त्याला किती प्रतिसाद देणार? यावर चर्चा न केलेली बरी... परंतु बौद्धिक क्षेत्रात काम करणाऱ्या मंडळींनी यावर गांभीर्याने विचार करून शासन आणि शासकीय यंत्रणांना त्यांची जागा दाखवून देण्याची गरज या निमित्ताने निर्माण झाली आहे. शिक्षण क्षेत्राचे उद्योगीकरण होण्याचा धोका मोठा असून तो वेळीच ओळखून तातडीने योग्य पावले उचलली नाही तर शिक्षणाच्या या बाजाराला आपण भविष्यात कधीही रोखू शकणार नाही.

आर्थिक उदारीकरणानंतर सरकारने उद्योग आणि व्यापार क्षेत्रातून अंग काढून घेणे हे विकासासाठी आवश्यक मानले गेले. त्यातून आर्थिक प्रगती झाली, हे नाकारता येणार नाही. परंतु, व्यापार आणि समाजकल्याण यात पुसटशी रेषा असते. शिक्षण आणि आरोग्य ही दोन क्षेत्रे नफा कमावण्याची साधने नसून ती राज्याची प्राथमिक जबाबदारी आहेत. दुर्दैवाने, गेल्या काही दशकांत सरकारने या क्षेत्रांकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यावसायिक केला आहे. शिक्षण क्षेत्रासाठी पुरेशी आर्थिक तरतूद न करणे आणि खासगी शाळांच्या मनमानीवर प्रभावी नियंत्रण न ठेवणे, या दोन प्रमुख आघाड्यांवर सरकार अपयशी ठरले आहे.

आज मुंबई, पुणे, नाशिक यांसारख्या शहरांतील खासगी शाळांनी शिक्षणाचे रूपांतर एका 'व्यापारी प्रारूपात' केले आहे. शाळांच्या प्रवेश शुल्काव्यतिरिक्त इतर मार्गांनी पालकांना लुटण्याचे तंत्र कमालीचे विकसित झाले आहे. कागदोपत्री दोन वर्षांत जास्तीत जास्त १५ टक्के शुल्कवाढीची मुभा असताना, प्रत्यक्षात अनेक शाळा दरवर्षी १५ ते ३५ टक्क्यांनी वाढ करीत आहेत.

विशेष म्हणजे, ही लूट केवळ शुल्कापुरती मर्यादित नाही. शाळांचे विशिष्ट प्रकाशकांशी आणि विक्रेत्यांशी साटेलोटे असते. 'एनसीईआरटी'च्या नियमांनुसार जी पुस्तके काहीशे रुपयांत मिळायला हवीत, त्यासाठी पालकांना साडेतीन ते आठ हजार रुपये मोजावे लागत आहेत. गणवेशाच्या बाबतीत तर ही लूट कळस गाठते. कापड बाजारात ३०० रुपयांना मिळणारा साधा शर्ट केवळ शाळेच्या 'लोगो'मुळे १५०० रुपयांना विकला जातो. ही निव्वळ नफेखोरी नसून पालकांच्या हतबलतेचा केलेला गैरवापर आहे.

सरकारने शुल्क नियंत्रण समित्या स्थापन केल्या आहेत, कायदे केले आहेत; परंतु या कायद्यांच्या अंमलबजावणीत प्रचंड पोकळी आहे. शाळाचालक राजकीयदृष्ट्या प्रबळ असल्याने शिक्षण विभाग त्यांच्यावर कारवाई करण्यास धजावत नाही. 'सीबीएसई' बोर्डाचे स्पष्ट निर्देश असूनही खासगी प्रकाशकांची महागडी पुस्तके पालकांच्या माथी मारली जातात. तक्रार केल्यास पाल्याचे शैक्षणिक नुकसान करण्याची किंवा त्याला हीन वागणूक देण्याची भीती पालकांना असते. या सामाजिक दबावामुळे पालक 'मूक बळी' ठरत आहेत.

शिक्षणाच्या या व्यापारीकरणाला पालकांची मानसिकताही काही अंशी जबाबदार आहे. ‘‘जास्त पैसे घेणारी शाळा म्हणजे जास्त चांगले शिक्षण‘‘ असा एक गोड गैरसमज पालकांमध्ये रुजला आहे. इंग्रजी माध्यमाचा ध्यास आणि मराठी शाळांकडे पाहण्याचा तुच्छ दृष्टिकोन यामुळे दर्जेदार सरकारी आणि अनुदानित शाळा बंद पडत आहेत. शिक्षणतज्ज्ञांच्या मते, प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच मिळायला हवे, मात्र बाजारीकरणाच्या झगमगाटात हा मूळ विचार मागे पडला आहे.

या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आता केवळ कागदी घोडे नाचवून चालणार नाही, तर सरकारने ठोस कृती आराखडा राबवणे गरजेचे आहे. सर्व शाळांमध्ये, मग त्या कोणत्याही बोर्डाच्या असोत, 'एनसीईआरटी' किंवा राज्य मंडळाची (बालभारती) पुस्तके अनिवार्य केली पाहिजेत. खासगी प्रकाशकांच्या पुस्तकांवर कठोर बंदी हवी. शाळांनी पालकांना विशिष्ट दुकानातूनच गणवेश किंवा शैक्षणिक साहित्य घेण्याची सक्ती केल्यास, त्या शाळेची मान्यता तत्काळ रद्द करण्याची कायदेशीर तरतूद हवी. शुल्क नियामक समितीने केवळ तक्रारीची वाट न पाहता दरवर्षी प्रत्येक मोठ्या खासगी शाळेच्या आर्थिक व्यवहारांचे ऑडिट करावे. नफा किती टक्के कमावला जातो, यावर मर्यादा असावी. शाळांमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन, सहली आणि इतर कार्यक्रमांच्या नावाखाली होणारी अवास्तव वसुली थांबली पाहिजे.

प्रत्येक शाळेत 'पीटीए' ( पेरेंट-टीचर असोसिएशन ) केवळ नावाला न ठेवता, तिला कायदेशीर अधिकार देऊन शाळेच्या निर्णयांत सहभागी करून घेतले पाहिजे.

शिक्षण संस्था हे नैतिक मूल्यांचे संस्कार करण्याचे केंद्र असायला हवे. जर या संस्थाच भ्रष्ट आणि व्यावसायिक साखळीचा भाग बनल्या, तर आपण कोणत्या पिढीचे निर्माण करत आहोत? काळानुसार बदल जरूर स्वीकारावेत, पण त्यांचा पाया शैक्षणिक असावा, व्यावसायिक नाही. शाळा या 'विद्येचे मंदिर'च राहायला हव्यात, त्यांचे रूपांतर 'नफ्याच्या दुकानात' होणे हे एका सुसंस्कृत समाजासाठी घातक आहे. सरकारने आता आपली जबाबदारी ओळखून या शिक्षणमाफियांच्या अभद्र युतीला वेळीच लगाम घालावा, हीच पालकांची माफक अपेक्षा आहे.

# वरखेड यात्रेत लाखो भाविकांची गर्दी

## लक्ष्मीदेवी आईचा उदो उदोने नगरी दुमदुमली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील श्री क्षेत्र वरखेड येथे मंगळवारी (दि. ७ एप्रिल) श्री आई लक्ष्मीदेवीच्या यात्रेनिमित्त लाखो भाविकांनी दर्शन घेतले. रखरखत्या उन्हाची पर्वा न करता राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांनी लक्ष्मीदेवी आईचा उदो उदोच्या जयघोषात नगरी दुमदुमवून टाकली. नवसाला पावणारी देवी म्हणून प्रसिद्ध असलेल्या या यात्रेसाठी सोमवारी रात्रीपासूनच भाविकांची गर्दी वाढू लागली होती. मंगळवारी पहाटेपासून दर्शनासाठी मोठी रांग लागली होती. मुख्य दिवशी मानाच्या पालखींसह



विविध पालख्यांचे फटाक्यांच्या आतषबाजीत स्वागत करण्यात आले. आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनीही देवीचे दर्शन घेतले. यात्रेदरम्यान भाविकांनी बोकड, कोंबडी, खणानारळ, तसेच पूरणावरणाचा नैवैद्य अर्पण करून नवस फेडला. डफाच्या निनादात मिरवणुका, पोतराजांचे नृत्य आणि जयघोषामुळे वातावरण भक्तिमय झाले होते. मंदिर परिसरात विविध दुकाने व शामियाने उभारण्यात आल्याने परिसर गजबजून गेला. दरम्यान, प्रचंड गर्दीमुळे वाहतूक व्यवस्थेवर ताण पडला. शिरसगाव ते वरखेड मार्गावर वाहनांची लांबच लांब रांग लागली होती. अरुंद रस्ते व अपुऱ्या पोलिस बंदोबस्तामुळे वाहतूक विस्कळीत झाली. काही ठिकाणी मंदिर परिसरात वाहने शिरल्याने पायी चालणाऱ्या भाविकांना अडचणींचा सामना करावा लागला. प्रशासनाकडून पिण्याच्या पाण्याची व आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. तहसीलदार डॉ. संजय बिरादार, गटविकास अधिकारी संजय लखवाल व पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले. भविष्यात तीर्थक्षेत्र विकासासाठी अधिक निधी मिळावा, अशी अपेक्षा भाविकांनी व्यक्त केली.

# दौंड-मनमाड मार्गावर नियमित धावणार तीन तीर्थक्षेत्र विशेष रेल्वे

**अहिल्यानगर :** दौंड-मनमाड रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचे काम पूर्णत्वास जात असताना, दक्षिण-पश्चिम रेल्वेने प्रवाशांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. गर्दीच्या हंगामात प्रायोगिक तत्त्वावर सुरू असलेल्या म्हैसूर-वाराणसी, हुबळी-वाराणसी आणि हरिद्वर-ऋषिकेश या तीन साप्ताहिक रेल्वे आता कायमस्वरूपी 'नियमित' करण्यात आल्या आहेत. या निर्णयाबद्दल पुणे विभागीय रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य रणजीत श्रीगोड यांनी महाप्रबंधक मुकुल सरण माथुर यांचे अभिनंदन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार, देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रे रेल्वेने जोडण्याचे काम सुरू आहे. शिर्डीचे साईबाबा आणि शनिशिंगणापूर या देवस्थानांचे महत्त्व लक्षात घेता, भविष्यात या मार्गावर आणखी नवीन रेल्वे सुरू होण्याची शक्यता आहे. पुढील काळात अहिल्यानगर रेल्वे स्थानक 'जंक्शन' म्हणून विकसित होत असून, पुणे-औरंगाबाद, कल्याण-माळशेज घाट आणि कर्जत-परळी यांसारखे प्रस्तावित मार्ग जिल्ह्याच्या वैभवात भर घालणार आहेत. मुंबई-शिर्डी मार्गे राजस्थान आणि गुजरातसाठीही नवीन रेल्वेची मागणी करण्यात आली असल्याचे श्रीगोड यांनी सांगितले.

# शनिवारी हरिगांव येथे वक्तृत्व स्पर्धा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** हरेगाव जनहीतविकास समिती व सूर्या प्रतिष्ठान यांच्या वतीने हरेगाव येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीराव फुले व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती दि. ११ एप्रिल रोजी साजरी होणार असून त्या निमित्ताने सालाबादप्रमाणे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.००वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे अभिवादन सभा होणार आहे.व्याख्यान होणार आहे.श्रीरामपूर तालुक्याचे पोलीस उप निरीक्षकअरुण धनवडे उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी ठीक ६.००वाजता शांततेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक आउट साईट मार्गे प्रतिमा मिरवणूक डी कॉटर येथिल सम्राट चौकात विसर्जन होईल त्या नंतर त्या ठिकाणी वक्तृत्व स्पर्धा होणार आहे. त्या नंतर महात्मा फुले यांचा चित्रपट दाखवीला जाणार आहे.सर्व विजयी स्पर्धकांना बक्षीस ,ट्रॉफी,प्रमाणपत्र, १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता आंबेडकर स्मारक हरेगाव येथे प्रमुख पाहुणे यांच्या उपस्थितीत दिले जाईल तसेच शैक्षणिक साहित्य वाटप केले जाईल तेव्हा हरेगाव परिसरातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन हरेगाव जनहीत विकास समिती ,सूर्या प्रतिष्ठान ,हरेगाव बुद्धविहार ट्रस्ट ,मॉर्निंग क्रिकेट क्लब सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

# तांबे वस्ती शाळेच्या वतीने नूतन केंद्रप्रमुखांचा गौरव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव :** नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांबे वस्ती च्या वतीने नूतन केंद्रप्रमुख भास्कर तांबे साहेब यांचा सत्कार आणि सेवानिवृत्त होत असलेल्या भाऊसाहेब सावंत या शिक्षकांचा सन्मान सोहळा अत्यंत उत्साहात आणि भावूक वातावरणात पार पडला. शिक्षकी पेशातील समर्पण आणि शैक्षणिक क्षेत्रातील प्रगतीचा आढावा या निमित्ताने घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुळा एज्युकेशन संस्थेचे सदस्य बाजीराव पाटील मुंगसे होते. तर प्रास्ताविक देविदास कचरे यांनी केले. यावेळी नवनियुक्त केंद्रप्रमुख भास्कर तांबे साहेब यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. आपल्या मनोगतात त्यांनी शाळेच्या गुणवत्तेसाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन केले.

तसेच दीर्घकाळ ज्ञानदानाचे पवित्र कार्य करून सेवानिवृत्त होत असलेले शिक्षक भाऊसाहेब सावंत सर यांचाही यावेळी जंगी सत्कार करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करताना उपस्थितांचे डोळे पाणावले होते.

तसेच चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप




देऊन त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला सरपंच चंद्रकांत मुंगसे, खरेदी विक्री संघाचे माजी संचालक कडूभाऊ तांबे, ह भ प सुखदेव महाराज मुंगसे, ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके, शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार युनूस पठाण यांनी केले तर आभार प्रदर्शन अभिषेक घटमाळ यांनी मानले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. शाळेचे मुख्याध्यापक देविदास कचरे सर व सहशिक्षक संदीप नांगरे यांनी कार्यक्रमाचे आयोजन करत विशेष परिश्रम घेतले.

# राज्यस्तरीय पुरस्कार व निवडीबद्दल जंगले व गायकवाड यांचा सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पानेगांव** महाराष्ट्र शासनाचा राज्यास्तरीय कला अध्यापक पुरस्कार नुकताच पानेगांव (ता. नेवासे) येथील शिक्षक अनिल जंगले तसेच जिल्हा फेडरेशनचे संचालक तानाजी गायकवाड यांचे चिरंजीव गणेश गायकवाड यांची महाराष्ट्र शासन आदिवासी विभाग गडचिरोली येथे नुकतीच निवड झाली त्या बद्दल पानेगांव येथे पोपटराव पाटील संस्थेच्या वतीने संस्थेचे संस्थापक संजय पाटील जंगले यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार सभागृहात पार पडला. यावेळी संजय जंगले यांनी सांगितले की,पानेगांव



मध्ये अनिल जंगले यांना राज्यस्तरीय कला अध्यापक पुरस्कार मिळतो हे गांवाला निश्चितच अभिमान आहे. तसेच गणेश गायकवाड यांनी आदीवासी विभाग गडचिरोली जिल्ह्यात शासनाच्या वतीने निवड झाली असून ते लवकरच राज्यसेवेची परिक्षा पास होवून मोठ्या पदावर काम करतील असं जंगले यांनी सांगितले.सत्काराला उत्तर देताना गणेश गायकवाड यांनी सांगितले कि, वडिल अशिक्षित असून हि आम्हाला शिक्षणासाठी कधीच कमी पडू दिलं प्रचंड आत्मविश्वास वडिलांनी वाढविल्याने हे शक्य झाले गांवकऱ्यांचे प्रेम आशिर्वादाने राज्यसेवा परीक्षा उत्तीर्ण होईल असा विश्वास गायकवाड यांनी व्यक्त केला. यावेळी पोपटराव पाटील संस्थेचे उपाध्यक्ष दादासाहेब काकडे, जेष्ठ संचालक रमेश गुडधे, सचिव आप्पासाहेब बोर्ड,पानेगांवचे उपसरपंच सुरेश जंगले,पानेगांव संस्थेचे संचालक अशोकराव गागरे सचिव शिवाजी जंगले, बाबासाहेब चिंधे, ह.भ.प. ज्ञानदेव गुडधे,भारत सेवा संघाचे उपाध्यक्ष भिकाजी जंगले,माजी सरपंच रमेश जंगले, मच्छिंद्र जंगले, चांगदेव घोलप,तानाजी घोलप,विजय जंगले, बाबासाहेब शेंडगे, प्रस्ताविक बाळासाहेब वतनदार यांनी केले सुत्रसंचलन संदिप जंगले यांनी केले आभार रमेश काकडे यांनी मानले.

# श्रीरामपूरचा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनत चालल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार हेमंत ओगले आणि नगराध्यक्ष करण ससाणे यांनी मुंबईत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांची भेट घेऊन नुकत्याच घडलेल्या प्रकरणाची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी केली. शहरात गेल्या काही दिवसांपासून काही प्रवृत्तींकडून वातावरण बिघडविण्याचे प्रयत्न होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. जातीय सलोखा बिघडविण्याच्या हेतूने काही समाजकंटकांकडून जाणीवपूर्वक हालचाली सुरू असल्याचा आरोप करत, अशा प्रकारांना तातडीने आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

वेळीच नियंत्रण न ठेवल्यास परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते. काहींचा उद्देश समाजात जाती-धर्मांत द्वेष पसरवून अशांतता निर्माण करण्याचा आहे, असे मत आमदार ओगले व नगराध्यक्ष ससाणे यांनी व्यक्त केले. मात्र, श्रीरामपूरची जनता सुज्ञ असून अशा प्रकारांना बळी पडणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, या प्रकरणी राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते यांची लवकरच भेट घेणार असल्याची माहिती आमदार ओगले यांनी दिली.

# बाबासाहेब सौदागर यांच्या धौस कादंबरीचे प्रकाशन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** चित्रपट गीतकार तथा साहित्यिक निसर्गकवी बाबासाहेब सौदागर यांच्या धौस या कादंबरीचे पुणे येथे प्रकाशन करण्यात आले. महाराष्ट्रातील लोककलेची होत चाललेली वाताहत या कादंबरीत अत्यंत कलात्मक पद्धतीने चित्रित करण्यात आली आहे.

तमाशा ही लोककला लयाला जाऊन तिचे ऑर्केस्ट्रामध्ये रूपांतर झाल्याचे वास्तव या कादंबरीत प्रभावीपणे मांडले आहे. अंगप्रदर्शन आणि अश्लीलतेच्या वाढत्या प्रभावामुळे लोककलेचे व्यापारीकरण कसे झाले, याचे वास्तवदर्शी चित्रण यात आढळते. निसर्गकवी बाबासाहेब सौदागर यांनी अनेक मराठी चित्रपटांसाठी गीतलेखन केले असून चित्ररंग या कार्यक्रमाडरे महाराष्ट्रभर कला सादर केली आहे. त्यांच्या कविता व चित्रपट गीतांचा विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. या समृद्ध अनुभवातून त्यांनी धौस ही कादंबरी प्रभावीपणे साकारली आहे. लवकरच या कादंबरीवर चित्रपट निर्मिती होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# राहुरी तालुक्यात इस्टर सण उत्साहात साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** प्रभू येशू ख्रिस्ताने पुनरूत्थाने आपले दैवत सिद्ध करून अन्यायावर व अंधारावर विजय मिळवला ईस्टर संडेच्या दिवशी प्रभु येशु आत्मबलाने व विचाराने पुन्हा जिवंत झाला असून त्याची शिकवण संपूर्ण जगाला प्रेरणादायी आहे. आपणही याच विचाराने प्रभू येशू ख्रिस्ताचा वारसा पुढे घेऊन प्रत्येकाला आदर व सन्मान दिला पाहिजे असे प्रतिपादन राहुरी स्नेहसदन चर्चचे प्रमुख धर्मगुरू फादर राजु शेळके यांनी इस्टर सणा निमित्ताने भाविकांना प्रवचन देताना केले.

या वेळी राहुरी स्नेहसदन चर्चचे प्रमुख धर्मगुरू फा. राजु शेळके व सहाय्यक धर्मगुरु फा.संपत भोसले यांनी विशेष इस्टर प्रार्थना अर्पण करत



ईस्टर म्हणजे पुनरूत्थानाचा विजय आणि नवजीवनाची हाक ख्रिस्ती विश्वासाचा केंद्रबिंदू कोणता असेल तर तो आहे प्रभू ख्रिस्ताचे पुनरूत्थान ईस्टर हा केवळ सण नाही. तो मृत्यूवर विजय निराशावर आशा आणि अंधारावर प्रकाशाचा अंतिम संदेश आहे असे स्पष्ट केले ख्रिस्ती धर्माच्या बायबलमध्ये स्पष्ट सांगितले आहे क्रूसानंतर तिसऱ्या दिवशी येशू उठला ही घटना केवळ ऐतिहासिक नाही. ती प्रत्येक मनुष्याच्या जीवनासाठी दिशा देणारी आहे क्रूसाने आपल्याला क्षमा दिली आणि पुनस्थानाने आपल्याला जीवन दिले आता त्या जीवनाला विश्वास पवित्रता आणि आशेने जगणे हीच आपली खरी जबाबदारी आहे. यावेळी राहुरी स्नेहसंदन पॅरिसमधील सडे वांबोरी डिग्रस धामोरी मुळानगर राहुरी रेल्वे स्टेशन राहुरी राजवाडा व तालुक्यातील खिस्ती बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आश्वी खुर्द जि.प. शाळेचा राज्यस्तरीय परीक्षेत डंका; वैष्णव क्षीरसागर राज्यात दहावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने शैक्षणिक गुणवत्तेचा उच्चांक गाठत राज्यस्तरीय ‘लक्षवेध स्पर्धा परीक्षा २०२५-२६’मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातील या शाळेच्या विद्यार्थ्यांनी राज्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवून विशेष कामगिरी केली आहे.

या परीक्षेत वैष्णव गणेश क्षीरसागर (इयत्ता दुसरी) याने राज्यात दहावा व जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळवत शाळेचा गौरव वाढवला. तसेच आर्यन निलेश शिंदे (इयत्ता पहिली) याने राज्यात २० वा व जिल्ह्यात १३ वा क्रमांक पटकावला. अन्विता संजय खरात (इयत्ता तिसरी) हिने राज्यात ४१ वा व जिल्ह्यात ३४ वा, तर स्वरा सोमनाथ क्षीरसागर (इयत्ता चौथी) हिने राज्यात ४१ वा व जिल्ह्यात ४० वा क्रमांक मिळवला.

‘मिशन आरंभ’ स्पर्धेतही शाळेचा दबदबा कायम राहिला. स्वरा क्षीरसागर हिने आश्वी खुर्द केंद्रात प्रथम, तर वेदश्री दिलीप लावरे हिने द्वितीय क्रमांक मिळवला.




या यशाबद्दल मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी खासगी शाळांना टक्कर देत मिळवलेले हे यश विशेष मानले जात आहे. शाळा व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थांकडून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# आश्वी बंधार्यावरील गेट बांधकामामुळे पाणी उशिरा

## चिंता वाढली; उद्या पाणी सुटण्याची शक्यता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर. :** आश्वी बंधाऱ्यावरील चारीच्या गेट बांधकामामुळे श्रीरामपूर करांना पाण्यासाठी थांबण्याची वेळ आली आहे. ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या काळात पाटबंधारे खात्याकडून पाणी सोडण्यास विलंब होत असल्याने श्रीरामपूर शहरातील नागरिक चिंतेत आहेत.

पाटबंधारे विभागास श्रीरामपूर शहरातील पिण्याच्या पाण्याची सर्व इत्यंभूत माहिती आहे. पिण्याचे पाणी आवर्तन सोडण्यासंदर्भात नगरपालिकेकडून यापूर्वीच पाटबंधारे विभागास पत्रव्यवहार करण्यात आला आहे. आमदार हेमंत ओगले नगराध्यक्ष करण ससाणे यांनी अहिल्यानगर पाटबंधारे विभागाचे अभियंता स्वप्नील मुळे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधत पाण्याच्या दुर्भिक्षाची जाणीव करून दिली आहे.

सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. पाण्याची यावेळी नितांत आवश्यकता असते. श्रीरामपूर शहरात पाण्याची टंचाई असून पाटबंधारे विभागाने तातडीने पिण्याच्या पाण्याचे आवर्तन सोडण्याची मागणी ही आमदार हेमंत ओगले नगराध्यक्ष करण ससाणे यांनी भ्रमणध्वनीवरून केली आहे. श्रीरामपूर नगरपालिकेच्या पिण्याच्या पाण्याचे तळ्याचे काम सध्या युद्ध पातळीवर सुरू आहे. धरणातून पिण्यासाठी तळ्यात येणारे पाणी त्याचे परिपूर्ण नियोजन करून ते शहराला पुरवावे लागते. कधी कधी धरणातून श्रीरामपूरला पिण्यासाठी चे पाणी उशिरा सुटते आणि ती टंचाई भासू नये यासाठी परिपूर्ण सतर्क राहावे लागते असे पाणीपुरवठा विभागाचे अभियंता निलेश बकाल पाटील म्हणाले.

दरम्यान आश्वी बंधाऱ्यावर गेटचे बांधकाम सुरू आहे. या कामाची माहिती घेत पाणी सुटण्या संदर्भात धरणावर पाटबंधारे विभाग सूचना करेल. श्रीरामपूर शहरात पिण्याच्या पाण्याचे आवर्तन सोडण्यासंदर्भात पाटबंधारे विभागही अनुकूल असून गेटचे बांधकाम आज किंवा उद्या संपण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर धरणातून श्रीरामपूर शहराला पाणी सोडण्याची नियोजन करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेले गेटचे काम लवकर संपल्यास उद्या धरणातून पाणी सोडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान तोपर्यंत श्रीरामपूर शहरातील नागरिकांनी पिण्याच्या पाण्यासंदर्भात नगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे पाणीपुरवठा विभागाचे अभियंता निलेश बकाल पाटील यांनी केले आहे.

# राहूरी विधी प्राधिकरणच्या पॅनल लॉयर पदी ॲड. प्रकाश संसारे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** अहिल्यानगर जिल्हा व सत्र न्यायालयांतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण चे अध्यक्ष व सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी येथील ज्येष्ठविधीज्ञ व नोटरी पब्लिक ॲड. प्रकाश संसारे यांची तीन वर्षाकरिता लॉयर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ॲड.प्रकाश संसारे हे राहुरी व अहिल्यानगर न्यायालयात गेल्या २६ वर्षापासून वकीलीचा व्यवसाय करीत आहेत. अनेक वेगवेगळ्या व गुंतागुंतीच्या खटल्यात त्यांनी काम पाहिलेलेआहे. सर्वसामान्य व गरजू लोकांना ते कायदेविषयक मार्गदर्शन करीत असतात सदर नियुक्ती बाबत ॲड प्रकाश संसारे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### पुणतांब्यात श्री कालभैरवनाथ महाराजांचा यात्रोत्सव उत्साहात सुरू



**पुणतांबा** : गोदावरी नदीकाठावरील श्री क्षेत्र पुणतांबा येथे ग्रामदैवत श्री कालभैरवनाथ महाराजांच्या यात्रोत्सवाला विविध धार्मिक कार्यक्रमांसह उत्साहात प्रारंभ झाला आहे. २३ मार्चपासून 'भार चढविणे' या विधीने यात्रेची सुरुवात करण्यात आली असून १७ एप्रिल रोजी 'भार उतरविणे' कार्यक्रमानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. यात्रेदरम्यान पुरणगाव, रामपूरवाडी, गोंधवणी, बोकटे, मुंगाव आदी गावांतून तसेच पुणतांब्यात चंद्रकांत महाराज जाधवराया यांच्या स्वारीची भव्य मिरवणूक काढली जाणार आहे. ढोल-ताशा, डफांच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत ही मिरवणूक पारंपरिक पद्धतीने निघते. दरम्यान, मुख्य स्थान असलेल्या सोनारी (ता. परांडा, जि. धाराशिव) येथेही भाविक मोठ्या संख्येने जाऊन दर्शन घेतात. यात्रोत्सव यशस्वी करण्यासाठी श्री कालभैरवनाथ महाराज यात्रा समिती प्रयत्नशील आहे.

### काळभैरवनाथ कावड यात्रेनिमित्त विविध कार्यक्रम



**सोनई** : श्री काळभैरवनाथ पायी कावड यात्रेनिमित्त घोडेगाव येथे १० रोजी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती युवा कार्यकर्ते सुभाष राख यांनी दिली. सालाबादप्रमाणे सेवानिवृत्त सैनिक पोपटराव कराळे व रामभाऊ गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र आगडगाव ते प्रवरा संगम अशी पायी यात्रा सुरू होत असून मार्गात भाविकांसाठी अन्नदानाची व्यवस्था करण्यात येत आहे. १० एप्रिल रोजी दुपारी साडेचार वाजता घोडेश्वर सांस्कृतिक भवन येथे यात्रेचे आगमन होणार आहे. यावेळी भाविकांचे भव्य स्वागत, आरती, पूजा, फळवाटप, आतषबाजी व मिरवणूक आयोजित करण्यात आली आहे. कार्यक्रमाला सुनील गडाख, सचिन देसारडा, आशिष शेळके, अनिल मोरे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या धार्मिक सोहळ्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### प्रवरेच्या सागर दळवी यांची सेल टॅक्स ऑफिसर पदी



**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा शारीरिक शिक्षण शास्त्र महाविद्यालयांचा विद्यार्थी सागर अशोक दळवी यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत घेतलेल्या सेल्स टॅक्स ऑफिसर या पदावर निवड झाल्याची माहीती प्राचार्य डॉ.संदिप हारदे यांनी दिली. सागर दळवी यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही चिकाटी, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रवरेचा विद्यार्थी हा विविध स्पर्धा परीक्षेत पुढे जावा या उद्देशाने मंत्री विखे पाटील यांनी सुरू केलेल्या स्पर्धा परीक्षा केंद्राचा या विद्यार्थ्याला मोठा फायदा झाला. महाविद्यालयाच्या माध्यमातून मिळालेले प्रोत्साहन आणि मिळालेल्या विविध सेवा सुविधा यामुळे मला हे यश मिळवता आल्याचे सागर दळवी यांनी सांगितले.

# खंडेराया यात्रेत साहिल कोहलीने लपेट डाव टाकून केले दादा शेळकेला चितपट !

## २ लाख ५१ हजारांचे रोख बक्षीस

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : दरवर्षीप्रमाणे राहुरी शहराचे ग्रामदैवत असलेल्या मार्तंड देव देवस्थान ट्रस्टच्या खंडोबा महाराज यात्रेनिमित्ताने राहुरी शहरात भव्य कुस्तीचा फड रंगला होता. यामध्ये प्रामुख्याने हरियाणाचा मल्ल साहिल कोहली याने २०२५ महाराष्ट्र केसरी दादा शेळके ला लपेट डाव टाकून चितपत करून जमलेल्या हजारो प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या कडकडाटात २ लाख ५१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक पटकावून जमलेल्या प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

राहुरीच्या या कुस्त्यांसाठी महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राच्या बाहेरून विविध राज्यातून आलेल्या सुमारे २५० मल्लांच्या कुस्त्या यामध्ये सुमारे १३ लाख रुपयांची बक्षीसे या मल्लांना देण्यात आली. याप्रसंगी प्रेक्षकांना विविध प्रकारच्या कुस्त्या बघण्याचे भाग्य लाभले. कुस्त्याचा हगामा पार पाडण्यासाठी नितीन शिंदे, आप्पा निकम व संभाजी मगदूस यांच्यासह यात्रा कमिटी व गावकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात सहकार्य लाभले असल्याचे उद्गार मार्तंड देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष रावसाहेब चाचा तनपुरे यांनी बोलतांना व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून राहुरीचे लोकनियुक्त नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे सर, गटनेते हर्ष तनपुरे, राजेंद्र बापु जाधव, नामदेवराव नवले, प्राध्यापक गणपतराव काकडे रामचंद्र सारण सर दिलीप अण्णा टोणपे, श्रीरामपूर विभागाचे पोलीस उपाधीक्षक



जयदत्त भवर, राहुरीचे कर्तबगार पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, यांच्यासह ताराचंद तनपुरे, प्रदीप भुजाडी, डॉ धनंजय मेहेत्रे,भिकू शेठ भुजाडी, रवींद्र आहेर, मनोज लोंढे, डॉ. कुलट, नितीन शिंदे भास्कर आपटे, डॉ स्वप्निल धोत्रे आदि मान्यवर उपस्थित होते. राहुरी शहरात अत्याधुनिक पद्धतीने उभारण्यात आलेल्या स्टेडियम मध्ये महाराष्ट्रासह अन्य राज्यातून आलेल्या मल्लांनी हजेरी लावली होती. यामध्ये मानाची कुस्ती मार्तंड देव देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष राऊसाहेब चाचा तनपुरे, सचिव सदाशिव शेळके,प्रतीक तनपुरे व यात्रा कमिटीचे सदस्य यांच्या वतीने २ लाख ५१ हजारांचे बक्षीस देऊन हरियाणाचा मल्ल साहिल कोहली याचा टाळ्यांच्या कडकडाटात सन्मान करण्यात आला.

सोमवार दिनांक ६ एप्रिल रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत राहुरी येथे खंडोबा यात्रेनिमित्त जंगी कुस्त्यांचा फड मोठ्या उत्साहात रंगला होता. याप्रसंगी सुमारे १३ लाख रुपयांची रोख बक्षीसे मल्लांना देण्यात आली. राहुरीतील कुस्तीसाठी नामवंत पैलवान येतात म्हणून या कुस्ती पाहण्यासाठी राज्यभरातून कुस्तीचे शौकीन राहुरी शहरात मोठ्या संख्येने दाखल झाले होते. सुमारे २५० मल्लांनी हजेरी लावली होती. यावेळी नितीन शिंदे आप्पा निकम संभाजी मगदूम यांनी पंच म्हणून काम पाहिले. यावेळी यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष रावसाहेब (चाचा) तनपुरे, उपाध्यक्ष दिनकर पवार, सचिव सदाशिव शेळके, नवनाथ पवार, संदीप तमनर यांच्यासह यात्रा कमिटीचे कमिटीचे अध्यक्ष विलास वराळे, उपाध्यक्ष तुषार पवार, गौरव तोडमल, खजिनदार अमोल तनपुरे उपखजिनदार दीपक साळवे, सचिव आकाश येवले, उपसचिव अमोल उंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वेळेत बचत व योग्य खर्चामुळे भविष्य सुरक्षित : सुभाष डिके

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : आजच्या काळात तरुणांसाठी पैसा हा केवळ गरज भागवण्याचे साधन नसून सुरक्षित, स्वावलंबी आणि यशस्वी जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचे प्रतिपादन सुभाष डिके यांनी केले. वेळेवर केलेली बचत आणि योग्य नियोजनाने केलेला खर्च यामुळे भविष्यकालीन जीवन अधिक सुखकर होते, असेही त्यांनी नमूद केले. येथील रा.ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय (स्वायत्त), श्रीरामपूर व ग्लोबल नगरी फाउंडेशन (यूएसए) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'तरुणांसाठी पैशाचे महत्त्व' या विषयावरील व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. आयटी क्षेत्रातील २२ वर्षांचा अनुभव असलेले डिके यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक शिस्त आणि गुंतवणुकीचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले की, तरुणांनी मिळणाऱ्या उत्पन्नातून प्रथम बचत करून नंतर खर्चाचे नियोजन करावे.

बँका, शेअर बाजार यांसारख्या क्षेत्रांचे ज्ञान आत्मसात करून योग्य ठिकाणी गुंतवणूक करणे गरजेचे आहे. सातत्याने बचत केल्यास ताणतणाव कमी होतो आणि जीवनातील उद्दिष्टे साध्य करण्यास मदत होते. तसेच दैनंदिन खर्चाची नोंद ठेवण्याची सवय लावल्यास आर्थिक स्थितीचा अचूक अंदाज येतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. मीनाताई जगधने होत्या. अध्यक्षीय समारोपात त्यांनी तरुणांनी पुस्तकी शिक्षणाबरोबरच व्यवहारिक ज्ञान आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. वेळेचे व पैशाचे योग्य नियोजन केल्यास यशाचा मार्ग सुकर होतो, असे त्यांनी नमूद केले. यावेळी प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे, दीपाश्री मुळे, डॉ. अनुप दळवी, डॉ. शरद शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. दिगंबर बनकर व प्रा. डॉ. संदीप कवडे यांनी करून दिला. आभार प्रदर्शन प्रो. डॉ. बाळासाहेब शेळके यांनी केले. व्याख्यानासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रशिक्षणांतून व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून पुढे जावे : शालीनीताई विखे



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : महिलांनी प्रशिक्षणाच्या माध्यमातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग व्यावसायिक दृष्टिकोन वाढीसाठी करावा जोपर्यंत आपल्याला आत्मविश्वास येत नाही. तोपर्यंत व्यवसायामध्ये माहिती घेत रहा. आपल्याबरोबरच इतरांनाही मदत करा.एकल महिलांना समजून घ्या. जनसेवा फौडेशनच्या माध्यमातून आजपर्यंत विविध प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यावरती भर दिला आहे . आपला हक्काचा व्यवसाय आपण सुरू करावा प्रशिक्षण जनसेवा फौडेशन देईल असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे यांनी केले. जनसेवा फौडेशन,लोणी आणि पंचायत समिती राहाता यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिलांसाठीच्या ब्युटी पार्लर प्रशिक्षणाच्या प्रमाणपत्र वितरण प्रसंगी सौ. विखे पाटील बोलत होत्या. यावेळी जनसेवा फाउंडेशनच्या संज्जला लांडगे, बाभळेश्वरच्या कृषी विज्ञान केंद्राच्या विस्तार विभागाच्या प्रमुख डॉ. प्रियंका खर्डे, प्रशिक्षिका स्वाती लड्डा, पंचायत समितीच्या अंगणवाडी पर्यवेक्षिका सोनाली कुंजीर आदींसह प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होत्या. जनसेवा फौडेशनच्या माध्यमातून आज चाळीस हजाराहून अधिक महिलांना विविध प्रकारच्या प्रशिक्षणातून स्वयंरोजगार दिला असल्याचे सांगत विखे परिवार विविध उपक्रमाच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यावरती भर देण्याबरोबरच महिला बचत गट आणि या गटाच्या माध्यमातून व्यवसाय निर्मिती करून सक्षम करत आहे. या प्रशिक्षणांमध्ये शिर्डी मतदार संघातील ६१ महीलांनी सहभाग घेतला.

## जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत संवत्सर परिसरात चर दुरुस्ती : परजणे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : कोपरगांव तालुक्यातील संवत्सर येथे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे चालविण्यात येणाऱ्या अंगणवाडी इमारतीचे उद्घाटन तसेच राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार २.० योजनेअंतर्गत व श्री श्री रविशंकर गुरुजी यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंग या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून संवत्सर परिसरातील चर खोलीकरण व रुंदिकरण कामाचा शुभारंभ नुकताच करण्यात आला. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजेश परजणे पाटील यांच्याहस्ते या दोन्हीही कामांचा शुभारंभ करण्यात आला असून पावसाळ्यापूर्वी ही कामे पूर्ण करण्याच्या सूचना श्री परजणे यांनी



संबंधितांना दिल्या.

आपल्या भाषणातून श्री परजणे यांनी आर्ट ऑफ लिव्हिंग ही श्री श्री रविशंकर यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९८१ मध्ये सुरु झालेली सेवाभावी संस्था आहे. ग्रामीण विकास आणि प्रामुख्याने जलसंधारणावर या संस्थेचा विशेष भर असतो. शेतामध्ये चर तयार करुन त्याद्वारे पावसाचे पाणी अडवणे व जमिनीत मुरवणे, जमिनीची धूप थांबविणे, भूजल पातळी वाढविणे, पिकांसाठी ओलावा टिकवून ठेवणे यासाठी चरांचा चांगला उपयोग होतो. आर्ट ऑफ लिव्हिंग ही संस्था केवळ आध्यात्मिक शिक्षण देणारी संस्था नसून समाजातील सकारात्मक बदल घडवून आणणारी एक मोठी चळवळ आहे.

शिक्षण आणि कौशल्य विकास, योग आणि ध्यान प्रशिक्षण, नशामुक्ती अभियान, महिला सशक्तीकरण, कैद्यांसाठी पुनर्वसन कार्यक्रम अशा विविध उपक्रमांबरोबर व्यक्तिच्या अंतर्गत शांततेपासून समाजाच्या कल्याणापर्यंत या चळवळीचा प्रभाव दिसून येतो. या संस्थेच्या कार्यासाठी लोकांचा सहभाग आणि सहकार्य मिळणे गरजेचे आहे अशी अपेक्षा व्यक्त करुन संवत्सर परिसरात दहा ते पंधरा चर असून त्यांचे खोलीकरण व रुंदिकरण करण्याबरोबरच त्यातील गाळ काढून पाणी अडविण्याची व ते जमिनीत जिरण्याची क्षमता वाढविण्याचे काम याद्वारे होणार आहे. शेतकऱ्यांनी या कामासाठी सहकार्य करावे असे आवाहनही श्री परजणे यांनी यावेळी केले.

संवत्सर ग्रामपंचायतीचे उपसरपंच विवेक परजणे यांनी प्रास्ताविकातून चर खोलीकरण व रुंदिकरणाबाबत माहिती दिली.

## रेणुका देवी जन्मोत्सवाचा दशकपूर्ती सोहळा उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्री क्षेत्र रेणुका देवी आश्रमात जगन्मातेच्या जन्मोत्सवाचा दशकपूर्ती सोहळा धार्मिक वातावरणात उत्साहात पार पडला. अभिषेक, महापूजा, द्राक्ष अर्चन, पुष्पांजली, महाआरती तसेच महाप्रसाद वितरणाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाची सुरुवात सौ. व श्री अशोकसिंग राजपूत व सौ. व श्री संकेत जोशी (चाळीसगाव) यांच्या हस्ते महापूजा व महाआरतीने झाली. पौरोहित्य महेश गुरु पावसे, श्रीपाद गुरु मेंगदे, ओंकार गुरु कुलकर्णी व गणेश गुरु कुलकर्णी यांनी केले. रामकृष्ण नगर महिला भजनी मंडळाने सादर केलेल्या भजन, पाळणा, जोगवा गायनामुळे सोहळ्याला विशेष रंगत आली. दशकपूर्तीबाबत माहिती देताना विश्वस्त आदिनाथ जोशी यांनी सांगितले की, सन २०१८ पासून हा जन्मोत्सव साजरा केला जात असून चैत्र महिन्यात देवी उपासनेला विशेष महत्त्व आहे. अधिकाधिक भाविकांनी या उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी फुलांचा वर्षाव करून जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी नलिनी देवी जोशी, शैलजा सातभाई, रंगनाथ मेंगदे गुरुजी आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजनासाठी रेणुका उपासना परिवाराने विशेष परिश्रम घेतले.

## श्रीरामपूर काँग्रेसचा बालेकिल्ला : राजेश ठाकूर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला असून येथील जनतेचा पक्षावर दृढ विश्वास असल्याचे प्रतिपादन झारखंडचे माजी प्रदेशाध्यक्ष राजेश ठाकूर यांनी केले. संघटन सृजन अभियानाअंतर्गत आयोजित काँग्रेस पक्षाच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे निरीक्षक तथा लातूरचे खासदार डॉ. शिवाजीराव कोळगे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव कृष्णा सांगळे, नगराध्यक्ष करण ससाणे, जिल्हाध्यक्ष सचिन




गुजर, माजी सभापती बाबासाहेब दिघे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, युवक काँग्रेसच्या राष्ट्रीय सचिव दिपाली ससाणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी खासदार कोळगे यांनी सांगितले की, प्रतिकूल परिस्थितीतही स्व. जयंतराव ससाणे यांच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या श्रीरामपूरमध्ये काँग्रेसने विधानसभा व नगरपालिका निवडणुकांमध्ये यश मिळवले असून आगामी निवडणुकांतही काँग्रेसचा झेंडा फडकणार आहे. नगराध्यक्ष करण ससाणे यांनी आमदार हेमंत ओगले यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष सर्व निवडणुका ताकदीने लढवून विजय संपादन करेल, असा विश्वास व्यक्त केला. जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांनी गेल्या तीन ते साडेतीन दशकांपासून श्रीरामपूरमध्ये काँग्रेसची सत्ता असल्याचे सांगत नव्या-जुन्यांच्या समन्वयातून पक्ष बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी युवक काँग्रेसच्या दिपाली ससाणे यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन मुजफ्फर शेख यांनी केले तर आभार मास्टर सरवरअली सय्यद यांनी मानले. बैठकीस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कांद्याच्या मोकळ्या गोण्यांच्या दरात झपाट्याने वाढ

## मात्र कांद्याला कवडीमोल भाव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगांव** : बाजारात सध्या विचित्र परिस्थिती निर्माण झाली असून एकीकडे कांद्याच्या गोण्यांच्या दरात मोठी वाढ झाली आहे, तर दुसरीकडे कांद्याला मिळणारा बाजारभाव अत्यंत कमी असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. मागील वर्षी साधारण १० रुपयांना मिळणारी प्लास्टिक (लाल) कांद्याची गोणी आता तब्बल २५ रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

त्याचप्रमाणे पूर्वी २२ ते २५ रुपयांत मिळणारी ज्यूट (गोणी) आता ५० रुपयांच्या घरात गेली आहे. गोण्यांच्या दरातील या वाढीमुळे कांदा साठवणूक व विक्रीसाठी लागणारा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. दरम्यान, उत्पादन खर्च वाढत असतानाच





> कांद्याला बाजारात फक्त ५ ते ८ रुपये दर मिळत असताना गोण्यांचे, वाहतूक व इतर खर्च मात्र झपाट्याने वाढत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना बाजार समितीत कांदा नेणे परवडत नसून ते जागेवरच विक्री करत आहेत; तरीही वजनात घट व वटावामुळे तोटा वाढतो आहे. या गंभीर परिस्थितीत शासनाने तात्काळ हमीभाव खरेदी केंद्र सुरू करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

यंदा कांद्याचे उत्पादन घटले आहे. बियाणे, खते, औषधे, मजुरी तसेच वाहतूक खर्च यामध्ये झालेल्या वाढीचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या खिशावर झाला आहे. परंतु, या सर्व खर्चाच्या तुलनेत बाजारात कांद्याला अपेक्षित दर मिळत नसल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

शेतकरी जेव्हा आपला कांदा बाजार समितीत विक्रीसाठी आणतो, तेव्हा त्याला केवळ ५ ते ८ रुपये प्रति किलो एवढाच भाव मिळत आहे. मात्र हा कांदा बाजारात आणण्यासाठी वाहतूक, हमाली, पॅकिंग आणि इतर खर्च वजा केल्यानंतर प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हातात फक्त ४ ते ५ रुपयेच उरतात. यामुळे खर्च आणि उत्पन्न यामधील तफावत जवळपास संपुष्टात आली असून अनेक शेतकरी तोट्याच्या उंबरठ्यावर उभे आहेत. शेतीतून नफा मिळण्याऐवजी केवळ खर्च भागवण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. एकीकडे शेतीसाठी लागणाऱ्या सर्व घटकांच्या किमती वाढत असताना, दुसरीकडे उत्पादनाला योग्य दर न मिळाल्याने शेतकरी हतबल झाला आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## सौरऊर्जेवरील १४ हायमॅक्स दिव्यांचे लोकार्पण

### संगमनेरमध्ये विकासाला गती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : संगमनेर शहरातील विविध प्रभागांसाठी सौरऊर्जे वर आधारित हायमॅक्स दिव्यांच्या योजनेला वेग मिळत असून मंजूर ४७ दिव्यांपैकी १४ दिव्यांचे लोकार्पण आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. भाजप स्थापना दिनाच्या निमित्ताने जनतानगर येथील जिजामाता गार्डन व लालतारा हाउसिंग सोसायटी परिसरात हा लोकार्पण सोहळा पार पडला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहकार्याने जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत सुमारे २ कोटी रुपयांच्या निधीतून हे ४७ सौर हायमॅक्स दिवे मंजूर करण्यात आले आहेत.

यापैकी १४ दिव्यांचे काम पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. यावेळी

> **विकासकामांना गती**
>
> शहरातील मूलभूत सुविधांना प्राधान्य देत महायुती सरकारच्या माध्यमातून निधी उपलब्ध होत आहे. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ५० लाखांचा निधी मंजूर झाला असून इतर विकासकामांनाही गती दिली जाईल, असे आमदार खताळ यांनी सांगितले.

बोलताना आमदार खताळ यांनी सांगितले की, संगमनेर विधानसभा मतदारसंघासाठी जिल्हा नियोजनमधून एकूण २०० सौरऊर्जेवरील हायमॅक्स दिव्यांना मंजुरी मिळाली आहे. त्यातील १०० दिवे बसविण्याचे काम पूर्ण झाले असून उर्वरित दिवे लवकरच कार्यान्वित होतील. या दिव्यांमुळे परिसरातील नागरिकांना सुरक्षेच्या दृष्टीने मोठा दिलासा मिळणार आहे. सौरऊर्जेवर चालणारे हे दिवे पूर्णतः स्वयंचलित असून दररोज सायंकाळी आपोआप सुरू होतात. विशेष म्हणजे वीज बिलाचा कोणताही भार स्थानिक संस्थांवर येणार नसल्याने ही योजना आर्थिकदृष्ट्या लाभदायक ठरणार आहे. या प्रसंगी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, शिवसेना शहराध्यक्ष विनोद सूर्यवंशी, भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पान १ वरुन

### डिलिव्हरी कामगारांची कसून पडताळणी बंधनकारक

बैठकीत गिग कामगारांची सायबर विभागाकडे नोंदणी, क्यूआर कोडयुक्त ओळखपत्र सक्तीचे करणे, तसेच ग्राहकांना मागणीवर ओळखपत्र सादर करण्याची अट यावरही चर्चा झाली. याशिवाय राज्यस्तरीय नोंदणी प्रणाली, डिजिटल युनिक आयडी, अपघात विमा, सामाजिक सुरक्षा योजना व तक्रार निवारण यंत्रणा विकसित करण्याचेही सुचविण्यात आले. महिला सुरक्षेच्या दृष्टीने जश्रर व णलशअ सारख्या सेवांमध्ये महिला चालक निवडीचा पर्याय देण्याचा प्रस्तावही पुढे आला. वाढत्या डिजिटल वितरण व्यवस्थेत नागरिकांची सुरक्षितता सर्वोच्च असल्याचे अधोरेखित करत गिग व प्लॅटफॉर्म कामगारांसाठी स्पष्ट आणि स्वतंत्र धोरणात्मक चौकट लवकरात लवकर तयार करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

### राज्यात आयटी-एआय विभागाची स्थापना

कायमस्वरूपी उपाय म्हणून 'महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम' राबविण्यास मंजुरी दिली आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने हा कार्यक्रम राबविला जाणार असून, यामुळे पूर नियंत्रणासोबतच बाधित शेतकऱ्यांना आणि उद्योजकांना गृहकर्ज, विमा आणि आर्थिक सवलतींचे मोठे पाठबळ मिळणार आहे.
महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरचे रूपांतर कंपनीत करून 'महाजिओटेक' ही नवी संस्था स्थापन केली जाणार आहे. भू-स्थानिक तंत्रज्ञानाचा वापर वाढल्यामुळे ग्रामीण भागातील जमिनीचे मोजमाप, गावठाण विकास आणि जलसंधारणाच्या कामात पारदर्शकता आणि अचूकता येईल.

### मुंबई-दिल्लीत 'टॉय कार' बॉम्बने घातपाताचा कट!

मिशन खिलाफत आणि सोल्जर्स ऑफ जिहाद सारख्या ग्रुप्सद्वारे त्यांना परदेशातील हँडलर्सकडून सूचना मिळत होत्या. विशेष म्हणजे, हे हँडलर्स भरती झालेल्यांना कधीही प्रत्यक्ष भेटत नाहीत; सर्व प्रशिक्षण ऑनलाईन दिले जाते. पारंपारिक दहशतवादी हल्ल्यांच्या तुलनेत हे 'स्मॉल-सेल' ऑपरेशन शोधणे अत्यंत कठीण असते. सीमेपलीकडील घुसखोरी किंवा प्रत्यक्ष प्रशिक्षण शिबिरांऐवजी आता युद्धभूमी डिजिटल झाली आहे. बॉम्ब वाहक म्हणून खेळण्यांचा वापर ही प्रवृत्ती रोखण्यासाठी आता सायबर पाळत ठेवण्यासोबतच, समाजामध्ये डिजिटल साक्षरता आणि अँटी-रॅडिकलायझेशन मोहिमा राबवण्याची गरज सुरक्षा तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. सध्या फॉरेन्सिक टीम जप्त केलेल्या वस्तूंची तपासणी करत असून, यामागे आणखी किती जणांचे जाळे पसरले आहे, याचा कसून तपास पोलीस करत आहेत.

# आ. धनंजय मुंडे यांनी नारायणगडावर घेतले महंत शिवाजी महाराजांचे आशीर्वाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बीड :** जिल्ह्यातील श्री क्षेत्र नारायणगडाच्या फिरत्या नारळी सप्ताहाच्या सांगतेला राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे यांनी उपस्थिती लावली. याच सप्ताहानिमित्त मनोज जरांगे पाटील आणि धनंजय मुंडे हे एकत्र येतील अशी शक्यता होती. परंतु प्रकृतीचे कारण देत जरांगे पाटील नारायणगडाच्या नारळी सप्ताहाला अनुपस्थित राहिले. धनंजय मुंडे यांनी नारायणगडाचे महंत शिवाजी महाराज यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतल्याने अनेकांच्या भुवया देखील उंचावल्या. बीडच्या गेवराई तालुक्यातील उमापूर येथे श्री क्षेत्र नारायणगडाचा ७४ व्या फिरता नारळी सप्ताहाची मंगळवारी सांगता झाली. याच प्रसंगी आमदार धनंजय मुंडे यांनी आमदार विजयसिंह पंडित यांच्यासह महंत शिवाजी महाराज यांची भेट घेऊन चर्चा देखील केली. मागील दोन वर्षांच्या काळात मनोज जरांगे पाटील आणि धनंजय मुंडे यांच्यातील खुला संघर्ष महाराष्ट्र पाहत आहे. मात्र याच सप्ताहाच्या निमित्ताने हे दोघेही एकत्र येतील अशी शक्यता होती.

नारायणगड आणि भगवानगड यांच्याशी निगडित असलेल्या नारळी सप्ताहाची परंपरा श्री संत भगवानबाबा यांनी सुरू केली. दरवर्षी हा सप्ताह एका विशिष्ट गावात आयोजित केला जातो. सप्ताहाच्या शेवटी काल्याच्या कीर्तनानंतर प्रसाद म्हणून नारळ दिला जातो. म्हणून याला नारळी सप्ताह म्हटले जाते. या सप्ताहात हजारो नारळांचे वाटप प्रसादाच्या रूपात केले जाते. हा सप्ताह अखंड हरिनाम सप्ताह असतो. यात ७ दिवस नामस्मरण, कीर्तन, प्रवचन आणि भजन असा कार्यक्रम असतो. शेवटच्या दिवशी भव्य महाप्रसादाची पंगत असते. याच निमित्ताने पंचक्रोशीतील भाविकांसह नेतेमंडळींची देखील उपस्थिती असते.

## प्रकृती बरी नसल्याने जरांगेंची अनुपस्थिती

नारायणगडाचा हा सप्ताह असल्याने मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती अपेक्षित होती. परंतु प्रकृती ठीक नसल्याचे कारण देत जरांगे पाटील यांनी पाठ फिरवली. प्रकृती ठीक झाल्यानंतर मनोज जरांगे पाटील हे महंत शिवाजी महाराज यांची भेट घेऊन नारायणगडाचे दर्शन घेणार असल्याची माहिती त्यांच्या सहकाऱ्याने दिली. मात्र केवळ धनंजय मुंडे आणि महंत शिवाजी महाराज यांची जवळीक पाहता जरांगे पाटील यांनी नारायण गडाच्या सप्ताहाच्या सांगतेला जाणे टाळले का? अशी देखील चर्चा या निमित्ताने सुरू आहे. आता पुढच्या वर्षी नारायण गडावर ७५ वा नारळी सप्ताहाचा अमृत महोत्सव होणार असल्याचं महंत शिवाजी महाराज यांनी कीर्तनातून जाहीर केले.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी झेंडे

## उपाध्यक्षपदी जाधव तर सचिवपदी गायकवाड







**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव समितीच्या शिरूर शहर अध्यक्षपदी रामभाऊ झेंडे तर उपाध्यक्षपदी रश्मी जाधव तर सचिवपदी प्रमोद गायकवाड यांची निवड करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी रामभाऊ झेंडे,उपाध्यक्षपदी रश्मी जाधव,शरद उघडे,सचिन जाधव,सुनील थोरात तर सचिवपदी प्रमोद गायकवाड व कार्याध्यक्षपदी बबन गायकवाड, कुणाल गायकवाड यांची एकमताने निवड करण्यात आली. ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला संदेश प्रेरणा देणारा असून त्यांच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून काम करणार असल्याचे नवनियुक्त अध्यक्ष रामभाऊ झेंडे यांनी मत व्यक्त करताना सांगितले. समाजात समानता,बंधुता आणि प्रगती मार्ग अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे नवनियुक्त सचिव प्रमोद गायकवाड यांनी मत व्यक्त करताना सांगितले. यावेळी आंबेडकरी अनुयायी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थिती होती.सर्वांनी नव्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून आगामी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# ग्रामीण भागातील गुरुदत्त मधील विद्यार्थी जडणघडणीत अग्रेसर :कातकडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**कोपरगाव :** तालुक्यातील शिरसगाव येथे श्री गुरुदत्त इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये शनिवार ४ मार्च रोजी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोपरगाव नगरपालिकेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष पराग संधान,तर प्रमुख पाहुणे म्हणून आरजेएस फाउंडेशनचे संस्थापक चांगदेव कातकडे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करुन झाली. श्री गुरुदत्त इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक केशवराव भवर यांनी उपस्थित असणाऱ्या प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.तसेच संस्थेचे संचालक स्वप्नील भवर यांनी आपल्या शैक्षणिक संस्थेच्या प्रगतीचा आढावा सांगितला. त्यानंतर प्रमुख पाहुणे मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की ग्रामीण भागात शिक्षिक संस्था चालवणे एवढे सोपे नाही.अतिशय गरीब घरातील विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहे. चांगल्या प्रकारे परीक्षेत गुण मिळवत आहे. हे विद्यार्थी पुढे चालून मोठे अधिकारी बनतील असे मला दिसत आहे.या नंतर कोपरगाव नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पराग संधान यांनी विद्यार्थ्यांना आपल्या भाषणातून मार्गदर्शन केले. या कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.नवीन इमारतीमध्ये विज्ञान प्रयोगशाळेबरोबरच तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग करून अद्यावत अशी तालुक्यातील प्रथम अख प्रयोगशाळा चालू करण्याचा मानस आहे.तसेच ग्रामीण भागतील विद्यार्थ्यांना १२ वी सायन्स तसेच जे ई ई व नीट सारख्या परीक्षेची तयारी चालू होणार आहे. परीक्षेच्या तयारीसाठी शहराकडे जाण्याची गरज राहणार नाही यामुळे शिरसगाव व पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना याचा खूप फायदा होईल.सदर कार्यक्रमासाठी सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी मेहनत घेतली.याप्रसंगी अध्यक्षांच्या हस्ते श्री गुरुदत्त ज्युनिअर कॉलेज (सायन्स) या नवीन इमारतीचे उद्घाटन करण्यात आले.तसेच या सुंदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पिंपळे सर व पैठणकर मॅडम यांनी केले. वंदे मातरम म्हणून कार्यक्रमाचा शेवट करण्यात आला

# उघडा खड्डा ठरतोय जीवघेणा

## गटारकाम तात्काळ पूर्ण करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**श्रीरामपूर :** शहरातील संगमनेर रोडवर हॉटेल सिद्धार्थचा कोपऱ्यावर गटारीचे काम सुरू केले असून त्या ठिकाणी मोठा खड्डा खोदून ठेवला आहे. पाच ते सहा दिवसापासून काम बंद असून हा जीवघेणा खड्डा असाच काही दिवस राहिला तर या खड्ड्यात नक्कीच बळी जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे या खड्ड्यावर ढापा बसवून गटारीचे काम पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. या गटारीची खूपच दुरवस्था झाली आहे. पावसाळ्यात तर नाल्यासारखे डबके साचले जाते. त्यामुळे चिखल आणि घाणीचे साम्राज्य व दुर्गंधी पसरली जाते. त्यामुळे तेथे ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. विशेष म्हणजे हा खड्डा संगमनेर रोडच्या मधोमधच असल्यामुळे वाहतुकीस अडथळा ठरत आहे. पायी चालणाऱ्यांना तर कसरतच करावी जगते त्यामुळे येथील व्यावसायिक खूपच त्रासले असून या खड्ड्यांचे व जातीचे काम तातडीने करावे, अशी मागणी या भागातील व्यापारी व नागरिकांनी केली आहे. या खडयाविषयी अनेकवेळा पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना केली आहे. आता नवनिर्वाचित सदस्य, नगराध्यक्ष पालिकेत कार्यरत आहेत त्यांनी या प्रश्नाकडे जातीने लक्ष घालून हा प्रश्न तातडीने सोडवावा अशी मागणीही करण्यात आली आहे.

# यशवंत पतसंस्थेला दीड कोटींचा नफा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील पतसंस्था चळवळीत आघाडीवर असलेल्या यशवंत नागरी सहकारी पतसंस्थेने २०२५-२०२६ आर्थिक वर्षामध्ये १ कोटी ५० लाख ७१ हजार रुपयांचा नफा मिळविला आहे. ग्राहकसेवा, पारदर्शकता आणि कोअर बँकींग सुविधांवर भर दिल्याने संस्थेने ठेवीदारांचा विश्वास संपादन केलेला आहे. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेकडे एकूण ठेवी ११७ कोटी ७७लाख ८ हजार इतक्या झाल्या असून लवकरच १५० कोटींचा टप्पा पार होईल, असा विश्वास संस्थेचे चेअरमन साहेबराव रक्टे व व्हा. चेअरमन मधुकर सातव यांच्यासह संचालकांनी व्यक्त केला.
संस्थेचे महाव्यवस्थापक माधव निंबाळकर यांनी दिलेल्या माहितीनुसार संस्थेच्या एकूण सात शाखा आहेत. संस्थेचा एकत्रित व्यवसाय ५५५ कोटी ४२ लाख ५३ हजार इतका झाला आहे. संस्थेचे वसूल भागभांडवल हे ३ कोटी ८ लाख ५० हजार असून स्वनिधी हा १० कोटी ११ लाख ४७हजार आहे. संस्थेकडे ५ कोटी ९९ लाख ६५ हजार इतका राखीव व इतर निधी आहे. संस्थेने तरलता पोटी ४२ कोटी ९६ लाख ७८ हजारची बँकेत गुंतवणूक केलेली असून एकूण कर्ज वाटप ८२ कोटी ८ लाख ८२ हजार इतके आहे. संस्थेचा सीडी रेशो हा ६२.७८ टक्के इतका आहे. संस्थेने कोअर बँकींग सुविधा, आरटीजीएस सुविधा, लाईटबिल भरणा, लॉकर सुविधा, क्यू आर कोड सुविधा सभासदांना उपलब्ध करुन दिल्या आहेत. संस्थेच्या आर्थिक कामकाज वाढीकरीता सर्व संचालक, सभासद ठेवीदार व कर्जदार, सेवक वर्ग, एजंट यांचे सहकार्य मिळत असल्याचे महाव्यवस्थापक माधव निंबाळकर यांनी सांगितले.

# स्थापना दिनाचे औचित्य साधत विजयी लोकप्रतिनिधींचा गौरव सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** - भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाला मिळालेल्या यशाच्या निमित्ताने भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) पक्षाच्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार सोहळा सोमवारी (ता.०६) उत्साहात संपन्न झाला. वैजापूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी, वैजापूर तालुक्याचे भूमिपुत्र तथा छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती कल्याण दांगोडे यांच्यासह



नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक व पंचायत समिती सदस्य यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे हाजी अकील सेठ, माजी नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी, उपनगराध्यक्ष शेख रियाज, कैलास पवार, नगरसेवक प्रकाश पाटील चव्हाण, शैलेश चव्हाण, देविदास वाणी, दिनेश राजपूत, गणेश खैरे, सचिन वाणी, शैलेश पोंदे, प्रेम राजपूत, भाजप महिला आघाडीच्या जयमाला वाघ यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्यासंख्येंने उपस्थित होते.

# शिवनानदीकाठी युवकाचा मृतदेह; घात की अपघात?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** शिरजगाव शिवारातील शिवना नदीकाठी २८ वर्षीय युवकाचा नग्न अवस्थेत मृतदेह आढळल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली असून घात की अपघात याबाबत तर्कवितर्क सुरू झाले आहेत. या प्रकरणी गंगापुर पोलिस स्टेशन मध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार मृत युवकाचे नाव गणेश अंबादास शिरसाठ (वय २८, रा. शिरजगाव) असे आहे. सोमवारी (दि. ६ एप्रिल) सकाळी गावकऱ्यांना त्याचा मृतदेह नदीकाठी नग्न



अवस्थेत आढळून आला. याची माहिती पोलिसांना मिळताच गंगापूर पोलीस स्टेशनचे पोलिस निरिक्षक कुमारसिंग राठोड व फॉरेन्सिक पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. मृतदेहाच्या डोक्याला व गुप्तांगाजवळ जखमा आढळल्याने हा खून आहे की वन्य प्राण्यांचा हल्ला, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे. मृतदेह गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. गणेशच्या पश्चात फक्त वडील आहेत त्यांच्या पार्थीवावर शिरजगांव येथील स्मशानभुमीत सायंकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यविधी करण्यात आला.या घटनेमुळे परिसरात उलटसुलट चर्चेला उधाण आले असून पुढील तपास गंगापूर पोलीस करत आहेत.

# शंकरराव येळवंडे यांचे निधन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**आळंदी :** येथील साई मंगल कार्यालयाचे सर्वेसर्वा शंकरराव रामभाऊ येळवंडे (वय ४५) यांचे आकस्मिक दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने आळंदी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, बहीण असा मोठा परिवार आहे. ते भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सचिव किरण येळवंडे व उद्योजक सचिन येळवंडे यांचे बंधू तसेच आळंदी नगरपरिषदेच्या नगरसेविका कांचनताई येळवंडे यांचे दिर होत. येळवंडे यांच्या निधनाने सामाजिक, राजकीय तसेच व्यावसायिक क्षेत्रात शोककळा पसरली असून विविध स्तरातून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# परसबाग निर्मिती स्पर्धेत निमगाव खैरी विद्यालय प्रथम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** खा. गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल निमगाव खैरी विद्यालयाला प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शालेय परसबाग निर्मितीमध्ये श्रीरामपूर तालुक्यात प्रथम क्रमांकाचे ११ हजारांचे पारितोषिक मिळाले. शाळेची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हा परिषद, खासगी प्राथमिक व माध्यमिक अशा एकूण १५५ शाळा या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. संस्थेचे सचिव अविनाश आदिक, गव्हर्निंग कौन्सिल सदस्या अनुराधा आदिक, सहसचिव ॲड. जयंत चौधरी व सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक शंकरराव शिंदे, सहशिक्षक बाळासाहेब बनकर व शाळेतील विद्यार्थ्यांच्या मदतीने शाळेत प्रशस्त परसबाग फुलवली. त्यासाठी पालक, ग्रामस्थ, स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य लाभले. निमगाव खैरी विद्यालयातील परसबागेत वांगे, मिरची, शेवगा, कढीपत्ता, कोबी, फ्लॉवर, टॉमेटो, पालक, मेथी, भोपळा, वाटाणा, कोथिंबीर, कांदा, लसुण, दोडका, घोसाळे, पुदिना, गवती चहा, अडुळसा आदी देशी पालेभाज्यांची व औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली. यातून विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या रोपांची व झाडांची प्रत्यक्ष माहिती मिळाली. कोणत्या भाजीतून कोणते पोषक घटक मिळतात यांचीही माहिती झाली. जल व्यवस्थापन, गांडुळ खत निर्मिती, कंपोस्ट खत प्रकल्प, पाण्याचा पुनर्वापर, ठिबक तुषार सिंचन, टाकाऊ पदार्थांपासून खतनिर्मिती, इको क्लब उपक्रम, पर्यावरण विषयक जनजागृती आदी उपक्रम विद्यालयात राबविण्यात येतात. परसबागेतील सर्वच भाजीपाला हा सेंद्रिय पद्धतीने उत्पादित केलेला असल्यामुळे दैनंदिन पोषण आहारामध्ये त्याचा दररोज समावेश केला जातो. विद्यालयाच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी संजीवन दिवे, विस्ताराधिकारी त्रिभुवन, केंद्रप्रमुख पिलगर, केंद्र समन्वयक पटारे यांच्यासह पालक, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी आदींनी कौतुक केले आहे.

## नशिबाची परिक्षा

**बुधवार दि .०८ एप्रिल २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १७९<br>२७८<br>३७७ | ७-२ | १२९<br>५७०<br>११० | जोड<br>७३-५२-१०<br>४८-२९ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४०<br>२३०<br>७८० | ५-६ | १५०<br>१६९<br>६०० | जोड<br>५९-१६-३२<br>८०-४६ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| २४०<br>२६८<br>२२२ | ६-७ | १६०<br>२५०<br>७०० | जोड<br>६३-०७-२१-<br>४८-७९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द•ख•ल



## अहिल्यानगरच्या डॉक्टराचा आंतरराष्ट्रीय सन्मान

**अहिल्यानगर** : शहरातील प्रख्यात वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. अतुल भांबळ यांना अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीकडून हॉस्पिटल मॅनेजमेंट या विषयात मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

गोवा येथे पार पडलेल्या पदवीदान समारंभात गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्या हस्ते डॉ. भांबळ यांना डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीचे डायरेक्टर अनिल कुमार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

डॉ. अतुल भांबळ हे अहिल्यानगर जिल्ह्यातील वांबोरी गावचे सुपुत्र असून, अत्यंत साध्या शेतकरी कुटुंबातून त्यांनी आपली वाटचाल सुरू केली. प्रचंड मेहनत, चिकाटी आणि सेवाभावी वृत्तीच्या जोरावर त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. हजारो उमेदवारांमधून निवड होऊन मिळवलेला हा सन्मान त्यांच्या गुणवत्तेची आणि कार्यक्षमता सिद्ध करणारा आहे. विशेष म्हणजे, डॉ. भांबळ हे अर्धांगवायू (पॅरालिसिस) ग्रस्त रुग्णांसाठी मोफत उपचार देण्याचे कार्य सातत्याने करत आहेत.

## नितीन शिरसाठ खूनप्रकरणी आरोपींना अटक करण्याची मगणी




**अहिल्यानगर** : भिमसैनिक नितीन शिरसाठ यांच्या निर्घृण खूनप्रकरणातील फरार आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले.

या उपोषणात रिपब्लिकन पक्ष (गवई) चे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, संपदा म्हस्के, प्रतीक बारसे, विजय शिरसाठ, ज्योती पवार, निलेश शिरसाठ, प्रतीक शिरसाठ, शशिकांत गायकवाड, सोनू जाधव, तात्या शिरसाठ, भावड्या कुन्हाडे, विक्रम आंग्रे, राकेश आल्हाट, संतोष लोंढे, प्रवीण गायकवाड, सुजय पाटोळे, विशाल गायकवाड आदींसह अनेक समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

या घटनेतील आरोपींना राजकीय वरदहस्त असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचा गंभीर आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला आहे. आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, आरोपींचे अचूक लोकेशन वारंवार पोलिसांना देऊनही त्यांना अटक करण्यात आलेली नाही. त्यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आरोपींना राजकीय दबावातून वाचवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत, या प्रकरणातील तपासाबाबत पारदर्शकता राखावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## मोफत नेत्रतपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अहिल्यानगर** : शहरातील दिल्ली गेट परिसरात आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्रतपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. शमी गणपती मंदिरासमोर, कानूर पठार पतसंस्था येथे सुरू असलेल्या या शिबिरात एकूण २५० रुग्णांची डोळ्यांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ७० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी म ोफत निवड करण्यात आली आहे. पुणे येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडत असून, डॉ. आनंद किशोर बोज्जा (नेत्रचिकित्सक) यांनी स्वतः रुग्णांची तपासणी करून त्यांना योग्य उपचाराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना डॉ. बोज्जा म्हणाले की, पूर्वी मोफत शिबिरांबाबत लोकांमध्ये शंका आणि भीती होती. शस्त्रक्रिया योग्य होणार नाही, अशी भावना अनेकांच्या मनात होती. मात्र आज अत्याधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टर आणि सेवा-भावी संस्थांच्या योगदानामुळे ही भीती दूर होत असून, अशा शिबिरांमुळे हजारो रुग्णांना नवदृष्टी मिळत आहे.

## बाबासाहेब गवते यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव

**अहिल्यानगर** : समता प्रतिष्ठानच्या (महाराष्ट्र राज्य) वतीने शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बाबासाहेब जालिंदर गवते यांनामहाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नुकतेच झालेल्या शिक्षकांच्या सन्मान सोहळ्यात पदवीधर आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते गवते यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. आमदार सत्यजित तांबे यांनी गवते यांच्या कार्याचे कौतुक करुन समाज घडविण्याच्या प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका कणा मानली जाते. गवते यांनी आपल्या ज्ञानदानाबरोबरच कर्तृत्वातून विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे.

# भक्ती रसात न्हाऊन निघालेला जनसागर

## अध्यात्मिक ज्ञान, अनिष्ट प्रथांवर आसूड ओढत महंतांनी सप्ताहाच्या माध्यमातून केलेला उपदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**खरवंडी कासार** : भगवानगड म्हणजे धर्मज्ञानपिठाबरोबरच शक्तीपीठ म्हणून भाविकांनी दिलेली मान्यता.. सप्ताहाच्या सांगतेला वारकरी संप्रदायिकांसह भगवान भक्तांच्या भक्ती प्रदर्शनाने संपूर्ण तालुका भारावून गेला.. गडाचे महंत न्यायाचार्य नामदेव शास्त्री यांचा प्रति ज्ञानेश्वर म्हणून झालेल्या उल्लेखाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडात करत दिलेली दाद.. अशा भक्ती पूर्ण वातावरणात भगवानगडाच्या ९२ व्या नारळी सप्ताहाची बडेवाडी येथे संत महंत व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सांगता झाली. तालुक्यातील भगवानगडाच्या ९२ व्या नारळी सप्ताहाच्या सांगते साठी माजी मंत्री धनंजय मुंडे, खासदार निलेश लंके, आमदार मोनिका राजळे, ड प्रताप ढाकणे, प्रभावती ढाकणे, बाळासाहेब आजबे, ज्येष्ठ कार्यकर्ते दादासाहेब मुंडे, बाळासाहेब सानप, प्रा. लक्ष्मण हाके, राधाताई सानप महाराज, रामगिरी महाराज, गडाचे उत्तर अधिकारी कृष्णा शास्त्री महाराज, बीड व अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्याच्या विविध भागातून मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित होते. पाथर्डी आगाराने यंदा प्रथमच सप्ताहासाठी जादा बसेस उपलब्ध करून दिल्या. सोमवारी रात्री महंत डॉ. नामदेव शास्त्री म हाराजांच्या कीर्तनाला ऐतिहासिक गर्दी जमली.



यावेळी बोलताना शास्त्री महाराज म्हणाले, वारकरी संप्रदायाने अंधश्रद्धा कधीही जोपासली नाही. आतापर्यंत गडाला तीन मुख्यमंत्र्यांनी भेट देऊन विकास कामाला सहकार्य केले. ऊस तोडणी कामगारांनी कष्ट करून गडावरील ज्ञानेश्वर मंदिराच्या दगडी कामासाठी १३ कोटी रुपये तर धनंजय मुंडे यांनी दोन कोटी रुपये दिले आहेत. सर्व सोयी सुविधा व अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह चार कोटी रुपयांचे महाप्रसादगृहाचे काम लवकर सुरू होईल. गडाचा इतिहास अध्यात्मिक व धार्मिक उपक्रमांबाबत नव्या पिढीने अभ्यासपूर्वक भक्ती करावी. वारकरी संप्रदाय हाच दिशादर्शक व मार्गदर्शक ठरून समाजाचे अंतिम कल्याण याच मार्गातून होणार असल्याचा संदेश भगवान बाबांनी त्यांच्या जीवन कार्यातून देत सम ाजाच्या बौद्धिक, नैतिक, सामाजिक व धार्मिक उन्नतीसाठी जीवन वेचले. यामुळेच बाबांच्या विचारांचे अनुयायी जीवनात समाधानी आहेत. भगवानगडाची हीच ताकद धार्मिक विचारांची चळवळ येत्या काळात बनेल. यावेळी बोलताना धनंजय मुंडे म्हणाले, शंभर घरांचे बडेवाडी गाव. भव्य दिव्य प्रमाणात सप्ताहाचे सर्व संकटांवर मात करत यशस्वी आयोजन करतोय, हाच भगवान बाबांचा चमत्कार आहे.

लाखोंचा समाज पूर्ण शिस्तीचे पालन व महंतांच्या आदेशावर वाटचाल करतो असे चित्र फक्त याच सप्ताहात पाहायला मिळते. आगामी गडाच्या सर्व सप्ताहामध्ये ज्या दिवशी शास्त्री महाराजांचे कीर्तन असेल त्या दिवशी उपस्थित राहू. ज्ञानेश्वरी विषयीचे सखोल ज्ञान व अत्यंत चिकित्सक, बौद्धिक, पद्धतीने निरूपण करणारे नामदेव शास्त्री खऱ्या अर्थाने ज्ञानाचे ऐश्वर्य संपन्न संत आहेत.

- वैयक्तिक जीवनात चढ उतार येतात. त्यावर मात करायची असते. धनु भाऊ मुंडे ,आमदार मोनिका राजळे, अॅड प्रताप ढाकणे यांच्याही जीवनात आलेल्या चढउतारांना ते सामोरे गेले. असे म्हणत त्यांनी आमदार मोनिका राजळे यांच्या राजकीय वाटचालीविषयी सहानुभूती व्यक्त केली. राजकीय वर्तुळात पंकजा मुंडे यांना डोळ्यापुढे ठेवून आमदार मोनिका राजळे यांना राजकीय वाटचाल करावी लागते. असाही अर्थ अभ्यासकांकडून लावला जात आहे.
- भाविकांना महाप्रसाद वाटपासाठी २२ ट्रॅक्टर पंगतीमध्ये फिरत होते. सांगता कार्यक्रमासाठी धनंजय मुंडे व बाळासाहेब सानप यांनी स्वतंत्र हेलिकॉप्टरमध्ये येत हजेरी लावली. जेसीबी मधून भाविकांनी धनंजय मुंडे यांच्यावर केलेल्या फुलांच्या उधळणीने मुंडे भारावून गेले. गोपीनाथ मुंडे यांच्या कुटुंबीयांपैकी कोणीही उपस्थित नसल्याने शास्त्रीजींनी गोपीनाथ मुंडे यांचा, गडासाठी च्या योगदानाचा आवर्जून उल्लेख करत मुंडे कुटुंब कसे गडाकडे आता दुर्लक्ष करते, याकडे भाविकांचे लक्ष वेधले. याला उत्तर देत धनंजय मुंडे यांनी मी घरात दिल आता कर्ता माणूस आहे. बहिण भावाच्या वतीने शुभेच्छा व्यक्त करतो. महाराजांच्या चरणी नतम स्तक होतो. असे सांगत असताना आमदार मोनिका राजळे स्मित हास्य करत असल्याचा त्यांनी बोलताना आवर्जून उल्लेख केला.
- सुरुवातीचे दोन दिवस अवकाळी पावसाने सप्ताहामध्ये मोठे अडथळे आले. बडेवाडी सह पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी अत्यंत परिश्रम करत संपूर्ण सेट अप पुन्हा उभा केला. रखरखत्या उन्हातही सांगता समारंभासाठी हजारो भाविकांनी एलईडी वॉलवर कार्यक्रम बघितला. भगवान बाबांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमला. उत्साह, चैतन्य, श्रद्धा व सेवेचे दर्शन आज लाखो भाविकांना घडले.

# जामखेडमध्ये वृध्द महिलेचे चाळीस हजार लंपास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : जामखेड शहरातील चष्मा दुकानात ' दोघी आल्या, आँखो का चष्मा है क्या ? यांचं झाल्यावर थांबा देतो दुकानदार म्हटल्यावर वृद्ध आजींची पिशवी तील चाळीस हजार रोकड लंपास केली, लगेच पळ काढला..

जामखेड शहरातील सहकार बँक शेजारी खरेदी विक्री कॉम्प्लेक्स नेत्रदीप चष्माघर दुकानात भर दुपारी घडली.

जामखेड तालुका व शहरात गुन्हेगारी नित्याची झाली आहे. चोरी, लूटमार, घरफोडी, आदी घटना वारंवार घडत आहेत. अनेकदा सीसीटीव्ही असूनही चोरीच्या घटना घडत आहेत. अशातच चोरी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. वर्दळीच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे असूनही चोरी झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

जामखेड मध्ये चोरीचे प्रकार वाढले असून चोरीच्या घटनांची संबंधित पोलीस स्टेशनला नोंद होते, मात्र चोरी उघडकीस येण्यास बराच अवधी लागतो. तर कधी गेलेली वस्तू मिळणे दुरापास्त होऊन जाते. अशावेळी पोलीस सीसीटीव्ही किंवा तत्सम पुराव्यांचा आधार घेऊन चोरट्यांचा शोध घेतात. मात्र अनेकदा चोरटे. पोलिसांना सीसीटीव्हीला न जुमानता सर्रास चोरी करण्याचे धाडस करतात. आता जामखेड मध्ये महिला चोरांची टोळी सक्रिय झाल्याचे चित्र एका घटनेवरून समोर आली आहे. ही घटनाही जाम खेड बस स्टँड जवळ शेजारी खरेदी विक्री कॉम्प्लेक्स मध्ये घडली आहे

चोरीचा प्रकार सीसीटीव्हीमधून उघड झाल्याने खळबळ उडाली आहे. त्यामुळे व्यापारी व नागरिक यांचे डोळे देखील हा चोरीचा प्रकार पाहून विस्फारले आहेत. शहरात महिला चोरांची टोळी कार्यरत असल्याची बाब समोर आली असून बँकेत व्यवहार करताना वयस्कर व्यक्तींनी सावधगिरी बाळगणे महत्वाचे झाले आहे.

या घटनेत विमल भगवान तवटे ( रा. तपनेश्वर गल्ली जामखेड) या भारतीय स्टेट बँक जामखेड शाखेत आपले पेन्शनचे चाळीस हजार रुपये काढून त्या आपला चष्मा दुरुस्त करण्यासाठी गेलेल्या होत्या. यावेळी दोन महिला रस्त्यासमोरील सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले असता या महिला वृद्ध आजी पाठलाग केल्याचे दिसत आहे.

तवटे या दुकानात गेल्यावर चष्मा दुरुस्तीचे पैसे देताना पिशवी काउंटर वर ठेवली त्याच वेळी या दोन महिलांनी तवटे आजी चष्म्याचे पैसे देण्यासाठी पैसे काढले असताना या दोन महिलांनी काउंटर वरची पिशवी लांबपास केली आणि पळ काढला त्याच वेळी दुकानदाराला तवटे आजी म्हणाले की माझी पिशवी गेली त्यावेळी दुकानदार त्यां दोन महिला च्या मागे पळाला पण त्या रस्त्यावर लावलेल्या शिफ्ट पांढरी चार चाकी गाडीमध्ये बसून प्रसार झाल्या.या घटनेचा जामखेड पोलीस पुढील तपास करीत आहेत.

> शहर व उपनगरांत चोरीच्या घटना वाढल्या आहेत. या घटनांचा छडा लावणे हे पोलिसांचे कर्तव्यच आहे. दिवसाढवळ्या चोर्या होत असतील तर शहरात चोरट्यांचे राज्य आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. पोलिसांनी रात्रीची गस्त वाढविण्याबरोबर दिवसाही पेट्रोलिंग करणे गरजेचे आहे. पोलिसांनी भयमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी चोरीच्या घटनांचा छडा लावावा.
>
> **– संतोष नवलाखा**
> आम आदमी पार्टी जामखेड तालुका अध्यक्ष

## अखंड हरिनाम सप्ताह व भव्य ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन



**शेवगाव** : शेवगाव शहरातील भाविकांसाठी आध्यात्मिक पर्व ठरणारा अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात साजरा होणार असून या निमित्ताने भव्य ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हनुमंताच्या वास्तव्याने व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पावन पदस्पर्शाने पवित्र झालेल्या भूमीत हा सप्ताह दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या भक्तिभावात पार पडणार आहे.

हा सप्ताह गुरुवार, दि. ०२ एप्रिल २०२६ पासून सुरू होऊन बुधवार, दि. ०९ एप्रिल २०२६ पर्यंत चालणार आहे. सप्ताहादरम्यान दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये ह.भ.प. रेणुकाताई पाडळे, ह.भ.प. गणेश बर्डे, ह.भ.प.अंगद झिरपे, ह.भ.प. मारुती झिरपे, ह.भ.प. किशोर भिसे, ह.भ.प. गणेश पाठक तसेच ह.भ.प. संतोष महाराज गारुळे यांचा समावेश आहे. सप्ताहातील प्रमुख आकर्षण म्हणून गुरुवर्य ह.भ.प. संदीपान महाराज म्हस्के शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. याशिवाय गायनाचार्य सर्वश्री. दिलीप महाराज गायकवाड,बापू म. काळे,ऋषिकेश म.निजवे लक्ष्मण म.नलवडे , चंद्रशेखर म. मुरदारे यांच्या उपस्थितीत भजन व कीर्तनाचे सत्र होणार असून अनेक स्थानिक व बाहेरील भजन मंडळे या सप्ताहात सहभागी होणार आहेत. या धार्मिक सोहळ्याचे आयोजन श्री पावन मारुती मंदिर देवस्थान ट्रस्ट, शहीद भगतसिंग मित्र मंडळ, टिळक युवक मंडळ व श्री विश्वामाऊली गुरुकुल यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. तरी परिसरातील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री संदीपान म.शास्त्री व देवस्थान ट्रस्ट मंडळी ने केले आहे.

## टेलच्या भागाकडे मुळा पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष

### उपविभागीय अधिकाऱ्यांमुळे शेतकरी अडचणीत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव** : मुळा पाटबंधारे विभागातून मुळा उजवा वितरिका क्रमांक ३ कलव्यातून सुटलेले उन्हाळी आवर्तनापासून टेलच्या भागाला जाणीवपूर्वकतेने वंचित ठेवण्याचा प्रयत्न अमरापूर उपविभागीय अधिकारी करत आहे टेलच्या भागाला पाटपाण्यापासून वंचित ठेवून वरील भागामध्ये पाणी वळवले जात असल्याने टेलच्या भागातील शेतकरी पाण्यापासून वंचित राहत आहेत येत्या दोन दिवसात पाणी न सोडल्यास अमरापूर येथे आव्हाने खुर्द ,शहापूर फलकेवाडी अमरापूर येथील ग्राम स्थांच्या वतीने अमरापूर येथे शेतक-यांच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्याच्या इशारा देण्यात आला आहे.

सद्यस्थितीत उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे पाणी पातळी झपाट्याने कमी होत असून शेतकऱ्यांच्या हातात तोंडाशी आलेले पिके जळण्याच्या मार्गावर आहेत.

त्यामुळे पाणी वाटपासंबंधी टेल टू हेड असे धोरण असताना देखील टेलच्या भागाला हक्काचे पाणी असताना सुद्धा आव्हाणे खुर्द, वडूले, अमरापूर, फ्लकेवाडी, भगूर या भागाकडे अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे पाणी प्रश्न हा शेतकऱ्याच्या अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न असून



याकडे लोकप्रतिनिधी आमदार,खासदार व अधिकारी यांनी गांभीर्यपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे दोन दिवसात निर्णय न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा सद्गुरुआई पाणी वापर संस्थेचे चेअरमन देविदास काकडे, शंकर काकडे, संजय भुसारी, चंद्रकांत काकडे, किशोर सोंडे ,किसन काकडे,दिलीप भुसारी, अशोक भुसारी,योगेश काकडे निलेश काकडे गणेश कमानदार,राजेंद्र काकडे महादेव कमानदार,संतोष फटांगडे, कोंडीराम आहेर, नारायण लांडे,ऋषीं पवार, बंडू औटी,यांनी दिला आहे.

## नंदकुमार कुरुमकर यांनी शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रात एक वेगळं स्थान निर्माण केले : प्राचार्य प्रशांत भोईटे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर यांनी शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रात भरीव योगदान देत एक वेगळे स्थान निर्माण केले असून, त्यांनी आपल्या संयमी व शांत स्वभावामुळे अनेकांशी मैत्रीचे अतूट नाते जोडले, असे गौरवदगार प्राचार्य डॉ प्रशांत भोईटे यांनी व्यक्त केले.

शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्व नंदकुमार कुरुमकर हे प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. त्या प्रित्यर्थ बेलवंडी येथील इंदिरा गांधी पॉलिटेक्निकलच्या वतीने प्राचार्य प्रशांत भोईटे यांनी सन्मान आयोजित केला होता. यावेळी बोलताना प्राचार्य भोईटे पुढे म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रात हे नंदकुमार कुरुमकर यांनी तालुक्याचे भाग्यविधाते सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे बापू यांच्या संस्कार व विचाराचा वारसा डोळ्यासमोर ठेवून ज्ञानदान



सारख्या पवित्र क्षेत्रात गेली ३८ वर्ष सेवा करून ते सेवानिवृत्त होत आहेत. निश्चितच कुरुमकर हे निवृत्तीनंतरही शिक्षण क्षेत्राला विसरणार नाहीत. त्यांनी शैक्षणिक क्षेत्राबरोबरच पत्रकारिता क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केल्याचे सांगून, कुरुमकर यांना पुढील उत्तम आरोग्य व उर्वरित आयुष्यासाठी प्राचार्य भोईटे यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

या सन्मान सोहळ्यासाठी विभाग प्रम ुख हवालदार सर, नातू सर, इथापे सर, शिंदे सर, रमेश पाचपुते सर, बिपिन इथापे सर, बिपिन गायकवाड सर, प्रतीक लाडाने यांच्यासह पॉलिटेक्निकल चे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

आभार बिपिन इथापे सर यांनी म ांडले.यावेळी सत्काराला उत्तर देताना नंदकुमार कुरुमकर भावनिक होत म्हणाले की सहकार महर्षी बापूंनी मला २३ व्या वर्षी शिक्षण संस्थेत नोकरीची संधी या नोकरीमुळे मला मुलांना उच्चशिक्षित करता आले कुटुंबाची ही प्रगती साधता आली हे केवळ नागवडे कुटुंबामुळेच शक्य झाले.

# आढळगावचा झेंडा राज्यात फडकला!

## सरपंच शिवप्रसाद उबाळे यांना 'आदर्श सरपंच' पुरस्कार; विकासकामांची दखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : आढळगावच्या सर्वांगीण विकासाचा राज्यस्तरावर गौरव झाला असून सरपंच शिवप्रसाद (सीमा) भाऊसाहेब उबाळे यांना प्रतिष्ठेचा 'आदर्श सरपंच' पुरस्कार प्रदान करण्यात आला. सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने अहिल्यानगर येथे हा भव्य सोहळा पार पडला.

या कार्यक्रमात उज्जैन महाकालचे श्रीमहंत श्रीकांतदास धुमाळ महाराज, आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील, हवामान तज्ञ पंजाबराव डंख, एलसीबीचे पोलीस निरीक्षक कबाडी साहेब तसेच राज्यातील सरपंच संघटनेचे नेते




बाबासाहेब पावसे पाटील यांच्या हस्ते उबाळे यांचा सन्मान करण्यात आला.गेल्या पाच वर्षांत आढळगावमध्ये झालेल्या विकासकामांमुळे गावाचा चेहरामोहरा अक्षरशः बदलला आहे.गावठाणात कॉंक्रिट रस्तेअंडरग्राउंड गटर लाईनमुळे स्वच्छतेत क्रांती घडवत स्मशानभूमी व दशक्रिया स्थळाचे आधुनिक रूपांतरआज या ठिकाणी परिसरातील अनेक गावांतील नागरिक विधीसाठी येत असल्याने आढळगाव नवा आदर्श ठरत आहे.'पाणी अडवा, पाणी जिरवा' मोहिमेतून ६-७ बंधारे उभारण्यात आले. परिणामी हजारो एकर शेती ओलिताखाली आली.वाड्यावस्त्यांपर्यंत सिंगल फेज वीज पोहोचवण्याचे काम ९० टक्क्यांपर्यंत पूर्ण झाले आहे.घरकुल, उडठ आणि देवस्थान विकास माध्यमातून सुमारे १५० घरकुलांचे वाटप,उडठ निधीतून रस्ते, बंधारे, ओढे व नदी सुशोभीकरण,श्री सिद्धेश्वर देवस्थान परिसराचा कायापालट केला आहे कोरोना काळात कोविड सेंटर उभारून आरोग्य व्यवस्थेला हातभार लावला. तसेच रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामांसाठी आंदोलने करून प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यावरूनच त्यांना सन्मानित करण्यात आले त्यावेळी या सोहळ्यास गावातील विविध मान्यवर, पदाधिकारी, पत्रकार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.जिथे नेतृत्व दमदार, तिथे विकास झपाट्याने!यावरून आढळगावच्या विकास मॉडेलला मिळालेला हा राज्यस्तरीय सन्मान इतर गावांसाठी दिशादर्शक ठरत आहे.

द • ख • ल

## मंथन राज्यस्तरीय सामान्यज्ञान परीक्षेत कवठे येमाई शाळेचे यश

**कवठे येमाई** : सातत्याने स्पर्धात्मक परीक्षा क्रीडा प्रकारात उज्वल यश संपादित करीत असलेल्या शिरूर तालुक्यातील कवठे येमाई गावठाण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील दुसरी इयत्तेतील तब्बल १० विद्यार्थ्यांनी मंथन राज्यस्तरीय सामान्यज्ञान परीक्षेत १०० पेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. या यशामुळे शाळेचे नाव जिल्हास्तरावर उज्वल झाले आहे.शाळेच्या या उत्तुंग यशाबद्दल जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे, शिरूर पंचायत समिती सदस्या कांचन सांडभोर,जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समितीचे



अध्यक्ष भारत भोर,सरपंच मनीषा भोर,शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य,शिक्षणप्रेमी ग्रामस्थांनी मंथन परीक्षेत यश मिळविणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे,शाळेच्या मुख्याध्यापिका रंजना गावडे,वरिष्ठ शिक्षक सखाराम फंड व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.
विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल पालक श्रीमती अनुराधा सोमनाथ काटकर यांनी या विद्यार्थ्यांना नुकतेच शाळेत येऊन वह्या व पेन देऊन त्यांचा सन्मान करत कौतुक केले. त्यांच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अधिक उत्साह निर्माण झाला.पालकांनीही मनापासून शाळेचे अभिनंदन व आभार व्यक्त करीत शाळेच्या अधिकाधिक गुणवत्तावान प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## गावडेवाडी झोपडीला लागलेल्या आगीत शेळ्यांचा मृत्यू; लाखोंचे नुकसान

**गावडेवाडी** : (ता. आंबेगाव) वनदेव वस्ती येथे काल दुपारी अचानक लागलेल्या भीषण आगीत राहुल सिताराम खंडागळे या आदिवासी बांधवांच्या झोपडी व गोठ्याचे मोठे नुकसान झाले. या आगीत अंदाजे दहा ते बारा शेळ्या जळून मृत्यूमुखी पडल्या. घटनेत घरातील संसारोपयोगी साहित्य, रोख रक्कम यांसह एकूण सुमारे पाच ते सहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अचानक लागलेल्या आगीमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच देवदत्त निकम यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली व खंडागळे कुटुंबीयांना दिलासा दिला. तसेच या घटनेतील नुकसानग्रस्तांना शासकीय स्तरावरून तातडीने व पूर्ण मदत मिळावी, यासाठी संबंधित विभागाला आवश्यक सूचना दिल्या. यावेळी खंडागळे कुटुंबीय तसेच गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.



**उन्हाळ्याचे तीव्र दिवस सुरू झाले असून वाढत्या तापमानामुळे आग लागण्याच्या घटना वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः झोपडीत राहणाऱ्या नागरिकांनी अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. लाकूड, गवत, प्लास्टिक यांसारख्या ज्वलनशील वस्तूंमुळे आग झपाट्याने पसरू शकते.**

**वीज उपकरणांचा वापर करताना काळजी घेणे, उघड्या आगीपासून सुरक्षित अंतर राखणे, गॅस सिलिंडरची योग्य देखभाल करणे आणि घराबाहेर पडताना वीजपुरवठा बंद ठेवणे आवश्यक आहे. तसेच, लहान मुलांना आगीपासून दूर ठेवणे आणि घराजवळ पाण्याची सोय ठेवणेही महत्त्वाचे ठरते.**

**नागरिकांनी थोडीशी दक्षता घेतल्यास मोठे अपघात टाळता येऊ शकतात, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. देवदत्त निकम राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष( शरद पवार गट) पुणे जिल्हाध्यक्ष.**

## प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेचा तिसरा टप्पा जाहीर; तरुणांसाठी मोठी संधी

पुणे : केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना (झचखड) २०२६ च्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात आली असून देशभरात ३१,४८० पेक्षा अधिक इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील तरुणांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. या योजनेअंतर्गत माहिती तंत्रज्ञान, बँकिंग व वित्तीय सेवा, पायाभूत सुविधा, रिटेल, ऑटोमोबाईल, औषधनिर्माण, उत्पादन, मीडिया, शिक्षण, पर्यटन, आरोग्य आदी विविध क्षेत्रांमध्ये इंटर्नशिप उपलब्ध आहेत. इंटर्नशिपचा कालावधी ६ ते ९ महिने असून दरमहा रु. ९,००० विद्यावेतन दिले जाणार आहे. इंटर्नशिप पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येईल.या योजनेंतर्गत उमेदवारांची पात्रता वय १८ ते २५ वर्षे, भारतीय नागरिकत्व आवश्यक, किमान १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा किंवा पदवीधर उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहतील. पूर्णवेळ नोकरी किंवा नियमित शिक्षण घेत असलेले उमेदवार अपात्र असतील. जे उमेदवार ऑनलाइन किंवा दूरस्थ शिक्षण घेत आहे ते उमेदवार पात्र आहेत. इच्छुक उमेदवारांनी ळिपींशअॅपीहळ.लिर.सीं.ळप या संकेतस्थळावर नोंदणी करून अर्ज करावा. पुणे जिल्ह्यात विविध शैक्षणिक पात्रतेनुसार रिक्त पदे उपलब्ध असून इच्छुकांनी तातडीने अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,४८१, रास्ता पेठ, पुणे दूरध्वनी : ०२०-२६१३३६०६ येथे संपर्क साधावा.

# महिला व बालकल्याणच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणार : अंकिता पाटील ठाकरे

### रिक्त पदे भरणार, अंगणवाडी केंद्रे आदर्श करण्यावर भर; आदिशक्ती अभियानाला चांगला प्रतिसाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नाझरे सुपे** :- पुणे जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागाच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्या तळागाळातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असे प्रतिपादन विभागाच्या सभापती अंकिता पाटील ठाकरे यांनी केले. सभापती पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी विभागाच्या कामकाजाला गती दिली असून पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी विभागाची सद्यस्थिती मांडली. महिला व बालकल्याण विभागात एकूण ८९९५ मंजूर पदांपैकी ८२९४ पदे

**महिला व बालकल्याण विभागामार्फत लेक लाडकी योजना, बेटी बचाओ बेटी पढाओ, मुलींसाठी संगणक प्रशिक्षण योजना तसेच विविध वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्या जात आहेत. महिलांच्या आरोग्य समस्यांवर लक्ष देत अंगणवाडी केंद्रांना अधिक सुविधा देऊन त्यांना आदर्श बनविण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

भरलेली असून ७०१ पदे रिक्त आहेत. ही पदे लवकर भरण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुणे जिल्ह्यात सध्या २२ ग्रामीण व आदिवासी प्रकल्प कार्यरत असून ४३९५ अंगणवाडी केंद्रांमार्फत सेवा दिली जात आहे. तसेच १५६ अंगणवाडी बीट कार्यरत आहेत.

सध्या सुरू असलेल्या आदिशक्ती अभियानांतर्गत महिलांचे आरोग्य, कुपोषण निर्मूलन, बालविवाह प्रतिबंध, महिला सक्षमीकरण, शिक्षण व रोजगार संधी वाढविणे यावर भर दिला जात आहे. या अभियानासाठी ग्राम, तालुका व जिल्हा स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. जिल्ह्यातील १३८७ ग्रामपंचायतींपैकी १३७० ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभाग घेतला आहे.




फोटो ओळ:पुणे जिल्हा परिषद महिला व बालकल्याण सभापतीपदी नियुक्ती झाल्यानंतर अंकिता पाटील ठाकरे यांचा अधिकारी व पदाधिकाऱ्यांकडून पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला

यावेळी जिल्हा कार्यक्रम अधिकारी आनंद एम. खंडागळे तसेच महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांचे सहकार्य मिळणार असल्याने विभागाच्या योजनांसाठी निधीची कमतरता भासणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

''महिला व बालकल्याण विभागाच्या योजना प्रभावीपणे राबवून त्याचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.''
– अंकिता पाटील ठाकरे

## ॲड. प्रकाश आंबेडकरांच्या उपस्थितीत राहुरीत वंचितचा मेळावा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : राहुरी विधानसभेचा पोटनिवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार, अहिल्यानगर उत्तर जिल्हाध्यक्ष तथा देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे नगरसेवक संतोष चोळके यांच्या प्रचाराचे रणशिंग फुंकण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष सन्माननीय ॲड. प्रकाश आंबेडकर हे येत्या ९ एप्रिल २०२६ रोजी राहुरी येथे हॉटेल आत्मा मालिक हॉल येथे पदाधिकारी व कार्यकर्ता यांना मेळाव्याद्वारे मार्गदर्शन करणार आहेत

राहुरी येथील आत्मा मालिक हॉल येथे आयोजित पत्रकार परिषदेत माहिती देताना वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मधुकर साळवे म्हणाले की एक गरीब मराठा कुटुंबातील आणि सर्वसामान्य कार्यकर्ता असणाऱ्या संतोष चोळके यांना वंचित बहुजन आघाडीने उमेदवारी देऊन प्रस्थापितांच्या घराणेशाहीला थेट आव्हान दिले आहे ही निवडणूक सर्वसामान्य कष्टकरी शेतकऱ्यांची आणि उपेक्षितांच्या अस्तित्वाची लढाई आहे

वंचित बहुजन आघाडीचे राहुरी तालुकाध्यक्ष बाळासाहेब जाधव यांनी सांगितले की भाजप हे धर्माच्या नावावरती राजकारण करीत असून आज भाजप विरोधात मोठे वातावरण निर्माण झालेले आहे सर्वसामान्य नागरिक शेतकरी हे भयभीत झाले असून वंचित बहुजन आघाडी व भाजप या दोन्ही पक्षातच ही निवडणूक होणार असल्याचे सांगितले वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार नगरसेवक संतोष चोळके म्हणाले की आमचे हिंदुत्व शेंडी जाणवे यांचे नसुन छ. शिवाजी महाराज यांचे हिंदुत्व आहे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानावर महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा आदर्श घेऊन चालणारे आहे विकासाचा नावावर शुन्य आणि धर्माच्या नावावर राजकारण करणाऱ्यांना या निवडणुकीत धडा शिकवा व प्रस्थापितांच्या घराणेशाहीच्या विरोधात एक सर्वसामान्य घराण्यातील गरीब मराठा म्हणुन आदरणीय ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मला उमेदवारी दिली आहे. ही धन शक्ती विरुद्ध जनशक्तीची लढाई असल्याचे प्रतिपादन करुन कार्यकर्त्या मेळावास उपस्थित राहण्याच्या आवाहन केले आहे. पत्रकार परिषदेत ज्येष्ठ नेते शिरीषराव गायकवाड बाबासाहेब साठे संदीप कोकाटे आदी सह पदाधिकारी उपस्थित होते.

## मंदिरा मधून उत्सव यात्रेतील चंगळवादाला सरकारने आळा घालावा : नवल शेवाळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुरंदर** : नुकत्याच ज्योतिबा च्या उत्सव कार्यकाळात काही तरुणांनी धुडगूस घालत येथील भाविक आणि पुजाऱ्यांची टिंगल टवाळकी करण्याऱ्यांना अति केल्यामुळे येथील पुजारी आणि सेवेकऱ्यांनी चोप दिल्या नंतर काहींनी राजकीय भांडवल आणि मीडियाची दिशाभूल करून येथील पुजारी वर्ग आणि व्यवस्थापनाला बदनाम करण्याचे कटू कारस्थान केले असून आशा धार्मिक स्थळी चंगळवाद करणाऱ्यांना शासनाने आळा घालण्याची मागणी गुरव विकास प्रतिष्ठान अध्यक्ष नवल शेवाळे यांनी करत प्रतिष्ठानचा आणि समस्त गुरव भविकांचा पाठिंबा दर्शवीला आहे. मंदिर संस्कृती उपासक पुजारी वर्गाला महाराष्ट्र राज्य गुरव विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवल शेवाळे यांनी भेट दिली त्यावेळी प्रतिष्ठान कार्यध्यक्ष रविंद्र गुरव, ठाणे शहर



अध्यक्ष दिवाकर गुरव आणि ज्योतिबा डोंगर वाडी रत्नागिरी येथील मानकरी ग्रामस्थ तसेच गुरव पुजारी समाज अध्यक्ष सुनील सांगळे, अमर नवळे महादेव झुगर, अंकुश दादणे, रमेश ठाकरे विजय बुने, आदिनाथ लादे, मधुकर शिंगे, प्रवीण भंडारे, सोमनाथ शिंगे, जयवंत शिंगे रणजित चौगुले, मारुती सतरंडेकर, गोरख बुने पोपट फुकटे निखिल चिखलकर तुषर झुगर, आदी उपस्तित होतें.देवाच्या दारात झालेल्या या नींदनीय प्रकाराचा पश्चिम महाराष्ट्र देवसंस्थान समितीने निपक्ष आणि पद्धतीने छडा लावून धुडगूस घालणाऱ्यान वर कारवाई करावी आणि पुजारी वर्गाला न्याय द्यावा अन्यथा तमामा राज्य गुरव समाजाला घन्टा, शंख नाद करत मंदिरात उपोषणाला बसण्याची वेळ येऊ देऊ नये असा विनंती वजा इशारा गुरव समाज संघटनानी दिला आहे. शेकडो वर्ष पुजारी मंदिर संस्कृती उपासकांनी धार्मिक सामाजिक आणि सांस्कृतिक रित्या जोपसली आहे परंतु असे दुर्दैवी प्रकार पुजार्यांना बरोबर कधी घडले नसल्याचे प्रसिद्ध ज्योतिष तज्ञ प्रवीण राजगुरू, सामाजिक कार्यकते कैलासआबा शेलार, सदानंद बारभाई यांनी सांगिले.

## गणेगाव खालसा हद्दीतील पुलाच्या कामावर प्रश्नचिन्ह

### निकृष्ट दर्जा व सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**रांजणगाव गणपती** : प्र. जि. मा. ५२ या मार्गावरील चासकमधील डाव्या कालव्यावरील पुलाचे काम अवघ्या महिनाभरापूर्वी पूर्ण झाले असतानाही या कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. पुलावर काही ठिकाणी स्टील उघडे पडलेले दिसून येत असून, ही बाब अत्यंत धोकादायक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.
या संदर्भात गणेगावचे सामाजिक कार्यकर्ते पंकज बांगर यांनी अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. मात्र, त्यांना याबाबत समाधानकारक माहिती देण्यात आली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.
दरम्यान, स्थानिक पत्रकारांनी पुलावरील उघड्या स्टीलचे छायाचित्रण करून ही बाब समोर आणल्यानंतर अचानकपणे ते उघडे स्टील कापून हटविण्यात आल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. हा प्रकार केवळ योगायोग आहे की पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न, असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.
नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथे घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेनंतरही संबंधित अधिकारी व ठेकेदार धडा घेत नसल्याची खंत व्यक्त होत आहे. नव्याने बांधलेल्या पुलावर हाताने खडी उकरता येत असल्याचेही नागरिकांनी निदर्शनास आणले असून, त्यामुळे कामाच्या गुणवत्तेबाबत संशय अधिकच गडद झाला आहे.
सदर पूल सध्या नागरिकांसाठी धोकादायक ठरत असल्याचे मत व्यक्त होत असून, या कामामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का, असा थेट प्रश्न आता जनतेतून विचारला जात आहे.
प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन चौकशी करावी व नागरिकांच्या सुरक्षिततेची हमी द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## आळंदीत ३५ वी राष्ट्रीय सब-ज्युनिअर कबड्डी स्पर्धा रंगतदार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळंदी** : येथे ॲम्यच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया, ॲम्यच्युअर कबड्डी फाउंडेशन ऑफ महाराष्ट्र आणि ॲम्यच्युअर कबड्डी असोसिएशन ऑफ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ३५ वी राष्ट्रीय सब-ज्युनिअर कबड्डी क्रीडा स्पर्धा (२०२५-२६) मुलं व मुली गटात उत्साहात पार पडली. श्री ज्ञानेश्वर विद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेला देशभरातील विविध राज्यांतील खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेस आळंदी नगरपरिषद, ज्ञानेश्वर महाराज संस्थान, ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, खेड तालुका क्रीडा शिक्षक संघटना तसेच आळंदीकर ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले. स्पर्धेदरम्यान रंगलेल्या सामन्यांना प्रेक्षकांची मोठी गर्दी झाली होती. विशेषतः युवा खेळाडूंच्या सहभागामुळे कबड्डीबद्दलचा वाढता उत्साह अधोरेखित



झाला. अंतिम सामन्यांमध्ये मुलींच्या गटात हरियाणा संघाने महाराष्ट्राचा पराभव करत विजेतेपद पटकावले. तर मुलांच्या गटात विदर्भ संघाने महाराष्ट्रावर मात करून विजेतेपद मिळवले. दोन्ही सामने अत्यंत चुरशीचे व उत्कंठावर्धक झाले.

**निकाल पुढीलप्रमाणे :**

**मुलं गट : प्रथम – विदर्भ, द्वितीय – महाराष्ट्र, तृतीय – कर्नाटक व आसाम मुली गट : प्रथम – हरियाणा, द्वितीय – महाराष्ट्र, तृतीय – राजस्थान व झारखंड स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ आमदार बाबाजी काळे, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, सुधीर मुंगसे, अजित वडगावकर, सचिन गिलबिले, सागर कुऱ्हाडे, सोमनाथ कुऱ्हाडे, पूजा घुंडरे व साक्षी कुऱ्हाडे यांच्या उपस्थितीत पार पडला. या स्पर्धेमुळे कबड्डी खेळाला नवी चालना मिळाली असून युवा खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिभा सादर करण्याची मोठी संधी उपलब्ध झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.**

## श्रीनाथ म्हस्कोबा मंदिरात पुनः प्राणप्रतिष्ठापना; प्रशासनाची व्यापक तयारी

### कोडीत येथे १९ एप्रिल ते १ मेदरम्यान ब्रह्मकलशोत्सव व महायज्ञ सोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सासवड** : श्री क्षेत्र कोडीत येथील श्रीनाथ म्हस्कोबा महाराज मंदिरात पुनःप्राणप्रतिष्ठापना, ब्रह्मकलशोत्सव व महायज्ञ सोहळा १९ एप्रिल ते १ मे २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या कालावधीत मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन तहसील प्रशासनाने विविध विभागांना आवश्यक सुविधा पुरविण्याच्या सूचना दिल्या आहेत.

मंदिर ट्रस्टच्या वतीने सहस्रचंडी यज्ञ, अतिरुद्र स्वाहाकार, लक्षमोदक हवन, सुदर्शन याग, वेदपारायण, शिवपंचायतन पूजा, शिवपार्वती विवाह सोहळा, कीर्तन महोत्सव व संत प्रवचन असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमासाठी राज्यभरातून भाविक उपस्थित राहणार असल्याची माहिती ट्रस्टकडून देण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण, बॅरिकेडिंग व पार्किंग व्यवस्था करण्यात येणार आहे. गटविकास कार्यालयामार्फत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, फिरते स्वच्छतागृह तसेच स्वच्छतेची विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. आरोग्य विभागाकडून वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, ॲम्ब्युलन्स व प्रथमोपचार सुविधा उपलब्ध राहणार आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्यांची दुरुस्ती व अडथळे दूर करण्यात येणार असून महावितरणकडून अखंड वीज पुरवठ्याची व्यवस्था केली जाणार आहे. तसेच एसटी महामंडळाकडून भाविकांच्या सोयीसाठी अतिरिक्त बस सेवा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. ''कार्यक्रम सुरक्षित व सुव्यवस्थित पार पडण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे,'' असे निर्देश तहसीलदार विक्रम राजपूत यांनी दिले आहेत. दरम्यान, या सोहळ्यामुळे परिसरात धार्मिक वातावरण निर्माण होणार असून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासन व स्थानिक नागरिकांचे सहकार्य लाभत असल्याचे मंदिर ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# चारित्र्याचा संशयातून पत्नीचा खून

### गॅलरीतून पडल्याचा बनाव!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : पुण्याच्या बिबवेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इथं एका तरुणाने आपल्या पत्नीची निर्घृण हत्या केली आहे. आरोपीनं पत्नीची हत्या करून ती गॅलरीतून पडल्याचा बनाव केला. मात्र त्याचा हा बनाव फार काळ टिकला नाही. पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

शुभम श्रीकांत घोडके असं अटक केलेल्या २९ वर्षीय आरोपी पतीचं नाव आहे. तर सारीका शुभम घोडके असं हत्या झालेल्या २३ वर्षीय विवाहितेचं नाव आहे. आरोपी शुभम हा मागील काही दिवसांपासून सारीकावर चारित्र्याचा संशय घेत होता. यातूनच ही हत्या झाल्याची माहिती समोर आली आहे.

**नेमकी घटना काय घडली?**
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शुभम



घोडके हा पत्नी सारिका हिच्यावर वारंवार चारित्र्याचा संशय घेत होता. यावरून दोघांमध्ये सातत्याने वाद होत होता. याच वादातून शुभमने संतापाच्या भरात सारिकाला बेदम मारहाण केली. त्यानंतर धारदार शस्त्राने तिच्यावर वार करत गंभीर जखमी केले. गंभीर जखमी अवस्थेत आरोपीनं सारीकाला तत्काळ रुग्णालयात दाखल केलं. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर तिला मृत घोषित केले.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच बिबवेवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक तपासात पोलिसांना पतीवर संशय आला. याबाबत विचारणा केली असता आरोपीने 'पत्नी गॅलरीतून पडल्याने मृत्यू झाला' असा दावा केला. मात्र घटनास्थळावरील परिस्थितीजन्य पुरावे आणि जखमांचे स्वरूप यामुळे पोलिसांचा संशय अधिकच बळावला.यानंतर पोलिसांनी शुभम घोडके याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी त्याला अटक करून न्यायालयासमोर हजर केलं आहे. घटनेचा पुढील तपास सुरू आहे.


**निविदा नोटीस**

**ग्रामपंचायत टाकळी हाजी, ता. शिरूर, जि.पुणे**

निविदा नोटीस क्र.०२ सन २०२५-२६

ग्रामपंचायत टाकळी हाजी, ता. शिरूर, जि.पुणे येथे सुशिक्षित बेरोजगार वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून खालील कामांसाठी दोन पाकीट पद्धतीने सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदेची नमुना रक्कम रु.२००/- जमा करून ग्रामपंचायत टाकळी हाजी येथे दिनांक ०९/०४/२०२६ ते १५/०४/२०२६ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील तसेच जमा करण्यात आलेल्या सिलबंद पाकिटातील तांत्रिक लिफाफा दिनांक १६/०४/२०२६ रोजी सकाळी ठीक ११ वाजता अथवा कार्यालयीन सोयीच्या वेळी ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.

| अ. क्र | कामाचे नाव | निधी | निवीदा रक्कम | बयाणा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे टाकळी हाजी अंतर्गत गावठाण बंदिस्त गटार करणे, ता. शिरूर, जि. पुणे | १५ वा वित्त आयोग | ७९९३००/- | सूट | ६ महीने |
| २ | टाकळी हाजी रोहिदास नगर येथे पेवर ब्लॉक बसविणे | अनू. जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे | ५९९९२८/- | सूट | ६ महीने |
| ३ | मौजे टाकळी हाजी अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर (गावठाण) येथे बंदिस्त गटार लाईन करणे | अनू. जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे | ९९९४६०/- | सूट | ६ महीने |

**निविदेच्या अटी व शर्ती** : १) सदर कामाच्या अटी व शर्तीचा तपशील कोऱ्या निविदा संचामध्ये नमूद केला आहे. २) कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरी यांनी राखून ठेवला आहे.

**ग्रामसेवक** **सरपंच**
**ग्रामपंचायत टाकळी हाजी, ता.शिरूर, जि.पुणे**

द•ख•ल



## शहरटाकळी येथे महालक्ष्मी मातेचा शनीवारी यात्रोत्सव

**शहरटाकळी** : शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी येथील महालक्ष्मी मातेच्या दोन दिवशीय यात्रोत्सवास शनीवार दि.११ एप्रील रोजी प्रमभं होत आहे. शहरटाकळी येथील सर्व जाती धर्माचे श्रद्धास्थान असलेल्या महालक्ष्मी मातेचा दोन दिवशीय यात्रोत्सव पुर्व परंपरा प्रमाणे चैत्र नवमीला शानीवार दि.११ एप्रील व रविवार दि.१२ एप्रील रोजी मोठ्या उत्साहात संपन्न होत असून, महालक्ष्मी मातेला यात्रोत्सवाच्या दिवशी नाथसागर येथून कावडीने आणलेल्या गंगाजलाने अभिषेक घातला जातो, नवसपूर्तीसाठी शेरनी (गूळ)वाटपाचा कार्यक्रम, सांयकाळी पूर्वीपासून चालत आलेल्या प्रसिद्ध अशा बारागाडी ओढण्याचा कार्यक्रम , संध्याकाळी पालखी मिरवणूक, दुसऱ्या दिवशी रविवार दि.१२ रोजी हजेऱ्या व कुस्त्यांचा जंगी हागाम्याचे आयोजन करण्यात आले असून ,यात्रा उत्सवानिमित्त विविध धार्मिक , सांस्कृतिक कार्यक्रम ाचा लाभ घेण्याचे आवाहन समस्थ ग्रामस्थ व यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## शिव पाणंद चळवळीचे राज्यस्तरीय अधिवेशन मढीत उत्साहात



**अहिल्यानगर** : पाथर्डी तालुक्यातील श्री क्षेत्र चैतन्य कानिफनाथ देवस्थान, मढी येथे महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन उत्साहात पार पडले. देवस्थान ट्रस्टच्या सहकार्याने आयोजित या अधिवेशनाला राज्यभरातून मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित राहिले होते.

सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत चाललेल्या या अधिवेशनाचे अध्यक्ष पुणे उपजिल्हाधिकारी गणेश मरकड होते. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, पाथर्डीचे निवासी तहसीलदार किशोर सानप, राज्य उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे, राज्य प्रसिद्धी प्रमुख रविंद्र खुडे, ज्येष्ठ नेते पोपट शेळके, अशोक कचरे आदी म ान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल निर्मळ यांनी केले. प्रास्ताविकात चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी देवस्थान ट्रस्ट, उपस्थित अधिकारी व राज्यभरातून आलेल्या शेतकरी बांधवांचे आभार मानले. राळेगणसिद्धीनारायणगव्हाण येथून सुरू झालेल्या शिव पाणंद चळवळीला पारनेर येथील आंदोलनानंतर अधिक गती मि ळाली. पेरू वाटप आंदोलन, न्यायालयीन लढे तसेच विविध जनजागृती उपक्रमांमुळे शासनाचे लक्ष वेधले गेले आणि महत्त्वपूर्ण शासननिर्णय मिळवण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले.

## हिरडगावच्या जिल्हा परिषद शाळेचा कायापालट होणार



**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील श्री नागनाथ महाराज यात्रेचे औचित्य साधत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिरडगाव येथे माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने काम करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला असून, हिरडगावची शाळा जिल्ह्यातील 'आदर्श मॉडेल' म्हणून विकसित करण्याचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे माजी विद्यार्थी व ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मा. सुरेश ढवळे होते. कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन बाळासाहेब भिसे यांनी केले, तर प्रास्ताविक मुख्याध्यापक संदीप होले यांनी मांडले. मनोगत गोवर्धन दरेकर, अशोक भुजबळ, देवराम दरेकर, संदीप दरेकर, रवींद्र दरेकर व पांडुरंग शिंदे यांनी व्यक्त केले. उपस्थितांचे स्वागत रवींद्र वाव्हळ, कैलास गलांडे आणि शिवाजी माने यांनी केले. विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती या स्नेहमेळाव्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे शिक्षण, उद्योग, राजकारण, व्यवसाय, क्रीडा, वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि आयटी क्षेत्रात देश-विदेशात कार्यरत असलेले माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या मातृशाळेच्या विकासासाठी त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

# बळीराजा शेत रस्ते आदेशातील फार्मर आयडी ब्लॉकची कारवाई करा : दादासाहेब जंगले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : बळीराजा शिव पाणंद शेत रस्ते योजनेच्या शासनाने २५ मार्च रोजी काढलेल्या आदेशानुसार रस्ते अडविणाऱ्यावर तातडीने फार्मर आयडी ब्लॉकची कारवाई करावी , अशी मागणी शिवपानंद शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह जिल्हाधिकारी यांना भेटून केली आहे.



राज्य शासनाने वेळोवेळी शेत रस्त्यांबाबत शेतकरी हिताचे शासन आदेश ,परिपत्रके काढलेली आहेत. असे असूनही अद्यापही अनेक शेतकऱ्यांचे रस्ते खुले झालेले नाहीत .आता एक महिन्यानंतर पावसाळा सुरू होत असून रस्त्याअभावी अनेक शेतकऱ्यांना हाल अपेष्टा सहन कराव्या लागणार आहे .अनेकांची शेती पडीक आहे . २५ मार्च रोजी काढलेल्या निर्णयानुसार गाव नकाशा वरील तसेच शेत वहिवाटीचे अतिक्रमित व अडविलेले सर्व रस्ते ७ दिवसात खुले करावेत , अशा सूचना सर्व संबंधितांना देऊनही त्यांनी रस्ते खुले न केल्यास महसूल यंत्रणेने तातडीने ७ दिवसात रस्ते खुले करावेत , मागणी केलेल्या सर्व रस्त्यांची तात्काळ मोजणी व सिमांकन करण्यासाठी कंत्राटी कर्मचारी उपलब्ध करावे , तहसीलदार व प्रांत यांचे कडील प्रलंबीत रस्ता प्रकरणे निकाली काढावीत , मोजणी हद्द पूर्ण झालेले रस्त्यांवर लगेच कायमस्वरूपी दगडी खुणा - नंबरिंग करण्यात यावे व प्रती किलोमीटर पंधरा लाख रुपये निधी उपलब्ध करून तातडीने कामे सुरू करावे , सर्व ग्राम पंचायती कडून शेत रस्त्यांचे प्रस्ताव मागणी करावी , विलंब होत असेल तर शेतकऱ्यांनी वैयक्तिक दिलेले अर्ज ग्राह्य धरावेत.

याप्रसंगी शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील, शरद पवळे,कायदा सल्लागार अँड. गोरख कडूस पाटील - श्रीगोंदा , सामाजिक कार्यकर्ते कारभारी गरड - नेवासा , ज्ञानेश्वर जंगले, नेवासा, सचिन शेळके पारनेर, बाबासाहेब धुमाळ - नेवासा, रामचंद्र अडसरे श्रीगोंदा,व्यंकटराव धट पाटील, कोपरगाव, विकास जाधव, पाथर्डी, माणिक राऊत, श्रीरामपूर, संकेत शिंदे- नगर, शिवराम निकम - शेवगाव, कानिफनाथ कदम नेवासा, दत्तात्रय काकडे - कर्जत,अशोक कुताळ - आष्टी,फारुख पठाण - पाथर्डी, शेषराव ठोंबरे - नगर, किसन परंडवाल - पारनेर, मच्छिंद्र पवार - श्रीगोंदा आदीसह जिल्ह्यातील शेतकरी उपस्थित होते.

# शेवगाव-पाथर्डी मतदारसंघात विशेष मतदार यादी पुनरिक्षण मोहिमेला वेग

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**शेवगाव** : भारत निवडणूक आयोग यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघात विशेष मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून या मोहिमेला वेग आला आहे. म तदार यादी अचूक व अद्ययावत ठेवण्यासाठी नागरिकांनी आपल्या नावांची पडताळणी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या माध्यमातून करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

या विशेष मोहिमेत सन २००२ मधील मतदार यादी आणि ऑक्टोबर २०२४ म धील अद्ययावत मतदार यादी यांची तुलना करून नावांची पडताळणी केली जात आहे. प्रत्येक मतदान केंद्रासाठी नियुक्त बीएलओ मार्फत हे काम सुरू असून कुटुंबातील रक्ताच्या नात्यातील सदस्यम ुलगा, मुलगी, नातू, नातयांची नावे मॅपिंग करण्याची प्रक्रिया देखील राबविली जात आहे. ज्या मतदारांची नावे जुन्या यादीत नाहीत मात्र नव्या यादीत आहेत, त्यांची माहिती सुसंगत करण्यासाठी आवश्यक तपशील गोळा केला जात आहे.

विशेषतः विवाहित म हिला व युवकांच्या बाबतीत त्यांच्या मूळ गावातील माहितीआई-वडिलांचे नाव, २००२ मधील मतदारसंघ, मतदार यादी क्रमांक आदी तपशील आवश्यक असल्याने संबंधितांनी आपले मतदार ओळखपत्र व इतर कागदपत्रे तयार ठेवावीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या पुनरिक्षणाचा मुख्य उद्देश मतदार यादीतील पुनरावृत्ती टाळणे प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव यादीत समाविष्ट करणे हा आहे.

मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पाथर्डी प्रसाद मते तसेच शेवगाव तहसीलदार आकाश दहाडदे यांनी नागरिकांनी कोणतीही शंका न बाळगता बीएलओंना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# 'संगठन सृजन अभियान'ला श्रीगोंद्यात वेग

## काँग्रेसची आढावा बैठक उत्साहात



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या 'संगठन सृजन अभियान' अंतर्गत श्रीगोंदा येथे आढावा बैठक उत्साहात पार पडली. तालुक्यातील संघटनात्मक स्थितीचा सखोल आढावा घेत पक्षबांधणीला नवसंजीवनी देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या 'संगठन सृजन अभियान' अंतर्गत श्रीगोंद्यात हॉटेल स्टार या ठिकाणी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीस ओडिसाचे राज्याचे माजी मंत्री तथा म हाराष्ट्र राज्याचे मुख्य निरीक्षक सरत राऊट यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ नेते व माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात तसेच आमदार हेमंत ओगले यांच्या मार्गदर्शनाखाली चर्चा झाली. आगामी काळात प्रत्येक गावपातळीवर संघटना मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात आला.बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत पक्षाची सध्याची स्थिती, स्थानिक प्रश्न आणि आगामी निवडणुकांची रणनीती यावर चर्चा करण्यात आली. बूथ मजबूत तर पक्ष मजबूत या सूत्रावर काम करण्याचे निर्देश देण्यात आले.या बैठकीला काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे, ज्येष्ठ नेते ज्ञानदेव वाफारे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रशांत ओगले, तालुका काँग्रेस अध्यक्ष संतोष भोईटे, शहराध्यक्ष ॲड. समित बोरुडे, महिला तालुका अध्यक्षा सुनिता दरोडे, युवक काँग्रेस अध्यक्ष विकास काळे, शहर अध्यक्ष मुजफ्फर मालजप्ते यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# न्यायाधीश निवास गटारीच्या विळख्यात

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात, लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**लिंपणगाव** : शहरातील मुख्य मार्गावर सुरू असलेल्या राज्य महामार्गाच्या कामामुळे नागरिकांचे हाल दिवसेंदिवस वाढत असून, न्यायाधीश निवासस्थानासमोरच गटारीचे साचलेले पाणी व दुर्गंधीमुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. संबंधित कामाकडे प्रशासन व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

शहरातून जाणाऱ्या राज्य महामार्गाचे काम काही महिन्यांपासून सुरू असले तरी भुयारी गटार (ड्रेनेज) पूर्ण न झाल्याने रस्त्याचे काम ठप्प झाले आहे. रस्त्याच्या कडेला साचलेले सांडपाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर पसरले असून, त्यातून दुर्गंधी पसरत आहे. यामुळे परिसरातील नागरिकांसह दुकानदारांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

विशेष म्हणजे, ही समस्या न्यायाधीशांच्या निवासस्थानासमोरच निर्माण झाली असूनही प्रशासनाने अद्याप ठोस उपाययोजना केलेली नाही. साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती वाढत असून, डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढला आहे.

दरम्यान, रस्त्यावरील खडी व धुळीमुळे वाहनधारक आणि पादचारी त्रस्त झाले आहेत. उडणाऱ्या धुळीमुळे दुकानदारांना व्यवसाय करताना अडचणी येत आहेत. अनेक वेळा नागरिकांनी नगरपरिषदेकडे तक्रारी करूनही कोणतीही दखल घेतली जात नसल्याचे सांगितले जाते.

स्थानिक नागरिकांनी तात्काळ गटाराचे काम पूर्ण करून रस्त्यावरील साचलेले पाणी हटवावे, तसेच रस्त्याचे काम लवकर पूर्ण करावे, अशी मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. **नागरिकांचा सवाल:** न्यायाधीशांच्या निवास स्थानासमोर अशी परिस्थिती असेल, तर सामान्य नागरिकांचे काय? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

# शिक्षक भारती संघटनेच्या पाठपुराव्याला यश

## मार्च पेड इन एप्रिल महिन्याच्या वेतनासाठी निधी उपलब्ध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : नवीन आर्थिक वर्षांत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाला निधी वितरणासाठी मंजुरी मिळाली आहे. निधी उपलब्ध नसल्याम ुळे मार्च पेड इन एप्रिल महिन्याचे वेतन बिल फॉरवर्ड होऊ शकलेले नाही. सर्व मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपल्या स्तरावरून वेतन बिल फॉरवर्ड केलेले आहे. शिक्षण निरीक्षक कार्यालयाने बिल मंजुरी करून ट्रेझरीकडे बिल सादर केल्यानंतर दोन दिवसात पगार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**अतिरिक्त शिक्षकांच्या वेतनाबाबत** : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे शिक्षण निरीक्षक कार्यालयावर समायोजन पूर्ण करण्याची जबाबदारी शिक्षण निरीक्षक कार्यालयाला संचालक कार्यालय पुणे यांनी दिली होती. परंतु मुंबईतील तिन्ही (उत्तर/ दक्षिण /पश्चिम) शिक्षण निरीक्षक कार्यालयात अतिरिक्त शिक्षकांची यादी प्रसिद्ध करणे, रिक्त पदांची यादी प्रसिद्ध करणे, आक्षेप असणाऱ्या अतिरिक्त शिक्षकांच्या सुनावण्या घेणे इत्यादी पैकी एकही प्रक्रिया पार न पडल्यामुळे अतिरिक्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन होऊ शकलेले नाही. शून्य शिक्षकी शाळा किंवा ज्या शाळेत शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त आहे त्यांनी वेतन बिल जनरेट करताना काही समस्या येत असेल तर शिक्षक भारती कार्यालयाशी संपर्क साधावा.

शिक्षक समायोजनाचा कॅम्प न झाल्याने पगार थांबवू नयेत यासाठी शिक्षण उपसंचालक व शिक्षण संचालक कार्यालय सोबत संपर्क केला असता याबाबत तात्काळ उपाययोजना होईल असे आश्वासन शिक्षण उपसंचालक व शिक्षण संचालक यांनी शिक्षक भारतीला दिले आहे. अशी माहिती शिक्षक भारतीचे नेते सुभाष मोरे यांनी दिली.

# साईसेवा पतसंस्थेवर चौकशीची टांगती तलवार; व्यवहारांवर निर्बंध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील साईसेवा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, काष्टी (ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) या संस्थेच्या आर्थिक व्यवहारांबाबत गंभीर अनियमि तता आढळल्याने प्रशासनाने चौकशीची प्रक्रिया सुरू केली असून नागरिकांना सावधगिरीचा इशारा देण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाच्या प्राधिकृत चौकशी अधिकाऱ्यांकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनानुसार,साईसेवा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, काष्टी (ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) या पतसंस्थेच्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८३ अन्वये सखोल चौकशी सुरू आहे. या चौकशीत संस्थेचे संचालक, अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आर्थिक जबाबदारी निश्चित होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.त्यानुसार सर्व व्यवहारांवर बंधने आणण्यात आली आहेत यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे असे सांगण्यात आले आहे.

साईसेवा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, काष्टी (ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर)यांची चौकशी सुरू असताना चेरमन,व्हा चेरमन,संचालकांच्या अथवा संस्थेच्या मालमत्तेची खरेदी-विक्री किंवा हस्तांतरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी कोणतेही आर्थिक व्यवहार गहाण, तारण, बक्षीसपत्र किंवा इतर स्वरूपातील करताना विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

त्यानंतर प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, चौकशीदरम्यान संबंधित संस्थेशी कोणताही व्यवहार केल्यास त्यातून होणाऱ्या संभाव्य फसवणुकीसाठी चौकशी अधिकारी जबाबदार राहणार नाहीत. त्यामुळे गुंतवणूकदार व ठेवीदारांनी विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे.ही कारवाई सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.'जिथे पैशांचा खेळ, तिथे सावध राहणे हेच शहाणपण!' सध्या या पतसंस्थाबाबत परिस्थिती संवेदनशील असून, नागरिकांनी कोणताही व्यवहार करण्यापूर्वी चौकशीची स्थिती लक्षात घेणे अत्यावश्यक ठरत आहे.

# मनपाच्या दोन सत्रातील साफसफाई निर्णयाविरोधात कर्मचाऱ्यांचा एल्गार

**अहिल्यानगर** : महानगरपालिका प्रशासनाने शहरातील दैनंदिन साफसफाईचे काम दोन सत्रांम ध्ये करण्याचा घेतलेला निर्णय मनपा कर्मचारी युनियनने धुडकावून लावला असून, एकाच सत्रात कामकाज सुरू ठेवण्याची ठाम मागणी करत आयुक्तांना निवेदन सादर करण्यात आले आहे. यासंदर्भात तातडीने सकारात्मक निर्णय न झाल्यास गुरुवार दि. ९ एप्रिलपासून आरोग्य विभागातील सर्व सफाई कर्मचारी बेमुदत धरणे आंदोलन छेडणार असल्याचा इशारा युनियनने अध्यक्ष जितेंद्र सारसर व सचिव आनंद वायकर यांनी निवेदनाद्वारे आयुक्त यशवंत डांगे यांना दिला आहे.

महानगरपालिका प्रशासनाने दि. १ एप्रिल २०२६ पासून शहरातील साफसफाईचे कामकाज दोन सत्रांमध्ये सकाळी ६ ते १० व दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, युनियनच्या मते हा निर्णय प्रत्यक्ष परिस्थितीला धरून नसून कामगारांसाठी अत्यंत गैरसोयीचा आहे. अनेक वर्षांपासून एकाच सत्रात साफसफाईचे काम सुरळीत सुरू असताना अचानक दोन सत्रांचा निर्णय घेणे अयोग्य असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

युनियनचे सरचिटणीस कॉ. आनंदराव वायकर यांनी निवेदनात म्हटले आहे की, बहुतांश सफाई कामगारांना पहाटे ५ वाजताच घरातून निघावे लागते. वाहतूक सुविधेअभावी अनेकांना पायीच हजेरीवर यावे लागते. एका फेरीसाठी सुमारे एक तासाचा प्रवास करावा लागतो. अशा परिस्थितीत सकाळी काम करून पुन्हा दुपारी हजेरी लावणे कामगारांसाठी अत्यंत कष्टदायक ठरत आहे.

याशिवाय सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढली असून दुपारच्या वेळेत प्रचंड उष्णतेचा तडाखा जाणवतो. दुपारी १२ नंतर नागरिकही घराबाहेर पडत नाहीत, अशा वेळी सफाई कर्मचाऱ्यांकडून काम करून घेणे त्यांच्या आरोग्यास घातक ठरू शकते. उष्माघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# विसापूर येथे बेकायदेशीर शस्त्रसाठ्यासह सराईत गुन्हेगार अटकेत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : तालुक्यातील विसापूर येथे बेकायदेशीर शस्त्रसाठा बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगाराला बेलवंडी पोलिसांनी अटक करत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत आरोपीकडून गावठी कट्टा (पिस्तूल), चार जिवंत काडतुसे व एक लोखंडी तलवार जप्त करण्यात आली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ३ एप्रिल रोजी बेलवंडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, विसापूर येथील सरस्वती विद्यालयाच्या मागील परिसरात एक इसम संशयास्पद हालचाली करत असून त्याच्याकडे बेकायदेशीर शस्त्र आहे. या माहितीच्या आधारे सोनवलकर यांनी तात्काळ तपास पथकाला कारवाईचे आदेश दिले.



पोलीस पथकाने घटनास्थळी सापळा रचून संशयित इसमाला ताब्यात घेतले. पंचासमक्ष घेतलेल्या अंगझडतीत आरोपीच्या पॅन्टच्या खिशातून चार जिवंत काडतुसे आढळून आली. त्याच्याकडे कोणताही शस्त्र परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी घरझडती घेतली असता घरातील दिवाणाखाली एक लोखंडी तलवार सापडली. तसेच पोलिस कोठडीत चौकशीदरम्यान आरोपीने लपवून ठेवलेला गावठी कट्टा देखील जप्त करण्यात आला.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अशोक लक्ष्मण कराळे (रा. विसापूर, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) असे असून तो रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याच्यावर यापूर्वी पोक्सो कायदा, दारूबंदी कायदा तसेच इतर विविध कलमांखाली गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोम नाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणकुमार लोखंडे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक मोहन गाजरे व त्यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली.

सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून आरोपीकडून आणखी माहिती समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## सायटेशन नोटीस

प्रो.फी. जमा.रु. पान नं. दि. / /२०२६

शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात :
चौ.अ.नं.२०२६

**अर्जदार : अनिल रुस्तुम चेमटे, रा. शिंगोरी** ता. शेवगाय
**सामनेवाला** : सरकार

सदर अर्जदार हा मौजे **शिंगोरी** येथील रहीवाशी आहे. गदर अर्जदार अनिल रुस्तुम चेमटे रा. शिंगोरी ता.शेवगाव, जि. अहिल्यानगर यांच्या पुतण्याची हर्षद केशव चेमटे यांचा जन्म दिनांक २७.०२.२०११ मौजे शिंगोरी ता.शेवगाव, जि.अ.नगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणेबाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म/मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहून गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या पुतण्याची जन्म/मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोदणी दाखला) मिळू शकला नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांच्या पुतण्याची जन्माची नोंद पंचायत समिती कार्यालय/ग्रामपंचायत शिंगोरी यांच्या जन्म मृत्यू नोंदणी रजिस्टरला नोंद घेऊन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार याने नगरपरिषद/ग्रामपंचायत कार्यालय येथे जाऊन जन्म-मृत्यू प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्म मृत्यूची नोंद नसलेबाबत दि.२७/०२/२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्म/मृत्युच्या १ वर्षाच्या आतमध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येऊ शकते, अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थितीमध्ये सदर अर्जदार यांच्या पुतण्याची नोंद जन्म-मृत्यू नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे. त्याकरिता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे.कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदाराचे सदरहू जन्म-मृत्यू नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर या जाहीर नोटिसीच्या तारखेपासून पंधरा दिवसांचे आत दि. /०४/२०२६ पूर्वी त्याने या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यू नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दि. /०४/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी नोटीस दिली असे.

शिक्का

**हुकूमावरुन**
**तहसीलदार शेवगाव**

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

बुधवार, दि.८ एप्रिल २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८



श्रीरामपूर : शिक्षण हा भविष्यातील विकासाचा राजमार्ग... पण श्रीरामपुरात शाळेत जाताना मुलांना गटारीच्या पाण्यातून ये जा करावी लागते. रयत शैक्षणिक संकुलाच्या पाठीमागील बोरावकेनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर गटारीचे पाणी साचल्यामुळे विद्यार्थ्यांना व पालकांना मनस्ताप सहन करावा लागतो.

**(छाया : सरताज सय्यद )**

### एका बाजूला साखर सम्राट; दुसऱ्या बाजूला शिक्षण सम्राट

# शिवसेनेच्या खा. ज्योती वाघमारेचा प्रस्तापितांना धक्का

**अशोक दुशींग । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : सोलापूरच्या रस्त्यावरून अनवाणी फिरणाऱ्या एका महिलेला गल्लीपासून दिल्लीपर्यंत पोहोचवण्याचा सन्मान राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मिळवून दिला असल्याचे राज्यसभेच्या नवनिर्वाचित खा. ज्योती वाघमारे यांनी काल शिर्डीत सांगितले. शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या राज्य सभेच्या नवनिर्वाचीत खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी नुकतीच शिर्डीस भेट देत साई समाधीचे दर्शन घेतले .संस्थांनच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



त्यानंतर त्यांचा अहिल्यानगर शिवसेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी संगमनेरचे आ अमोल खताळ नेवासाचे आ विठ्ठलराव लंघे माजी खासदार सदाशिव लोखंडे जिल्हाप्रमुख कमलाकर कोते नितीन अवताडे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी त्यांनी स्थानिक राजकारणावर भाष्य करत येथील शिक्षण सम्राट व साखर सम्राट वर चांगलीच तोफ डागली. त्या म्हणाल्या की जगणं खूप सोपं आहे पण काड्या करणाऱ्यांचा नाड्या आधी लक्षात घ्यावे लागतात. येथील साखर सम्राट यांनी आपल्या जगण्याच्या अनेक नाड्या आपल्या हातात ठेवले आहेत.

आमचा प्रत्येक शिवसैनिक साखर सम्राट विरोधात लढतोय एका बाजूला साखर सम्राट दुसऱ्या बाजूला शिक्षण सम्राट पण आमचे शिंदे साहेब आहेत गोरगरिबांचे हृदय सम्राट अशा शब्दात उपस्थितांची मने जिंकली ज्यांच्या डोक्यावर भगवा असतो तो कुठल्याही साखर सम्राटाविरुद्ध नतमस्तक होत नाही मी शिर्डीत येताना खासदार म्हणून आले नाही किंवा नाही संपर्क प्रमुख म्हणून मी तुमच्या सर्वांची बहीण म्हणून शिर्डीत आले आहे.

संपर्कप्रमुख म्हणून जबाबदारी घेताना शिर्डी लोकसभा मतदारसंघ एक संघ असला पाहिजे गटबाजीला पक्षात अजिबात थारा नाही. लोकसभेच्या २०२४ ला पक्षाचा शिर्डीत पराभव झाला. तो इतिहास आपल्याला बदलून टाकून २०२९ मध्ये शिर्डीत शिवसेनेचा भगवा फडकवायचा आहे. यावेळी त्यांनी आ. खताळ यांच्या कार्याची दखल घेत म्हणाल्या की, प्रस्थापितांच्या कानाखाली काढला जाळ ते आहेत आमचे अमोल खताळ अशा शब्दात त्यांनी आ. खताळ यांची प्रशंस केली यावेळी त्या म्हणाल्या की, मी कालच राज्य सभेच्या खासदार पदाची शपथ घेत भारताचे संविधान व छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकरांना स्मरूण घेतली. योगा योगाने माझी आहिल्या नगर जिल्ह्याच्या संपर्कप्रमुख पदी निवड झाली. त्यामुळे मी आज येथे बैठकीस आले असता सर्व धर्म समभाव असलेल्या साईबाबांचे दर्शन घेतले.

साईचा आशिर्वाद समस्त महाराष्ट्रावर रहावा शेतकऱ्यांवर रहावा लाडक्या बहिणींवर रहावा अशी पार्थना केल्याचे यावेळी सांगितले.

## राहुरी विधानसभा पोटनिवडणूक अर्ज छाननीत सात अर्ज बाद

### एका उमेदवाराची माघार !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : काल राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या अर्ज छाननी मध्ये सात उमेदवारांचे अर्ज आवश्यक प्रस्तावकांच्या सह्या नसणे, अनामत रक्कम नसणे व नामनिर्देशन पत्र परिपूर्ण भरलेले नसल्याचे आदी कारणांवरून या सात उमेदवारांचे अर्ज निवडणूक अधिकाऱ्याने नामंजूर केले आहेत.

अर्ज नामंजूर करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे अशी आहेत. उमेश महादेव म्हेत्रे, दत्तात्रय नारायण म्हैस, कांबळे त्रिषला मिलिंद, शिवाजी आनंदा कदम, खेमनर नंदकुमार भागवत, सोहम बापूसाहेब शिंदे, मोहम्मद शोएब सुभेदार शेख यांचे अर्ज बाद झालेल्या मध्ये समावेश आहे. आणि प्रवीण सुभाष दळवी या अपक्ष उमेदवाराने आपला उमेदवारी अर्ज मागे घेऊन निवडणुकीतून माघार घेतली आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत नऊ एप्रिल अशी असल्याने अजून दोन दिवसात काय घडामोडी होतात हे आता ९ एप्रिल रोजी स्पष्ट होणार आहे.

### कचऱ्यातूनच घराची चूल पेटते; पण हाताला कामच नाही!

## सुका कचरा वेचकांना देण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : शहर स्वच्छ ठेवण्यासाठी दररोज पहाटेपासून मेहनत करणाऱ्या कचरा वेचक बांधवांचे आयुष्य सध्या मोठ्या संकटातून जात आहे. प्लास्टिक, कागद, काच गोळा करून दिवसाची गुजराण करणाऱ्या या कष्टकरी कुटुंबांसाठी आता जगणंच कठीण बनले आहे. पूर्वी शहरातील कचरा गाड्यांमधून मिळणारा सुका कचरा हा त्यांच्या उपजीविकेचा मुख्य आधार होता.



त्या कचऱ्यातून मिळणाऱ्या थोड्याफार उत्पन्नावरच त्यांच्या घरातील चूल पेटायची. पण आता हीच कमाईची वाट बंद झाली आहे. कचरा गाड्यांवरील सुका कचरा थेट इतरांकडून गोळा करून विकला जात असल्याने स्थानिक कचरा वेचकांच्या हाताला काम उरलेले नाही.

आम्ही दिवसभर कचरा गोळा करतो, तेव्हाच दोन वेळचं जेवण मिळतं. पण आता कचरा मिळत नाही, तर घर कसं चालवायचं? असा सवाल एका महिला कचरा वेचकाने केला.

अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून मुलांच्या शिक्षणावरही परिणाम होत आहे. कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतच्या वतीने महापालिका आयुक्तांकडे निवेदन देत या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यात आले आहे. यातून कचरा गाडीवरील सुका कचरा गोळा करण्याचा हक्क स्थानिक कचरा वेचकांना देण्यात यावा, ठेकेदारांकडून होत असलेल्या दुहेरी उत्पन्नावर तात्काळ नियंत्रण आणावे, स्थानिक कचरा वेचकांची अधिकृत नोंदणी करून त्यांना कामात प्राधान्य द्यावे, कचरा वेचकांना घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेत अधिकृत सहभाग द्यावा, केंद्र व राज्य शासनाच्या धोरणानुसार कचरा व्यवस्थापन राबवावे या सर्व मागण्यांवर १५ दिवसांत सकारात्मक निर्णय न घेतल्यास महानगरपालिकेवर आक्रोश मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

शहर स्वच्छ ठेवणाऱ्या या अदृश्य हातांकडे दुर्लक्ष करणे म्हणजे त्यांच्या जगण्याचा हक्क हिरावून घेणेच ठरेल. आता प्रशासनाने संवेदनशीलता दाखवून त्यांच्या आयुष्यात पुन्हा आशेचा किरण निर्माण करावा, अशी सर्वसामान्यांचीही भावना आहे.

## श्रीरामपूर नगरपालिकेत 'स्टॉल गैरव्यवहार' प्रकरण गाजणार

### कर्मचाऱ्याचा स्वेच्छानिवृत्ती ठराव जिल्हाधिकाऱ्यांच्या रडारवर




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर नगरपालिकेतील बहुचर्चित 'स्टॉल गैरव्यवहार' प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणात आरोपांच्या केंद्रस्थानी असलेले कर्मचारी संजय श्रीपाद शेळके यांचा स्वेच्छानिवृत्तीचा ठराव रद्द करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते अमित मुथा यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

या तक्रारीची गंभीर दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी आता १३ एप्रिल २०२६ रोजी सुनावणी निश्चित केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील स्टॉल वाटपात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा ठपका ठेवत जिल्हाधिकाऱ्यांनी यापूर्वीच ४ दोषारोप निश्चित केले होते. तत्कालीन मुख्याधिकारी सोमनाथ जाधव यांनी या प्रकरणी संजय शेळके यांना जबाबदार धरून शिस्तभंगविषयक कारवाईचा अहवाल दिला होता.

**मुख्याधिकाऱ्यांवर गंभीर आरोप**

अमित मुथा यांनी आपल्या तक्रारीत आरोप केला आहे की, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी सभेची दिशाभूल करून पदाचा गैरवापर केला आहे. दोषी कर्मचाऱ्याला वाचवण्यासाठीच हा स्वेच्छानिवृत्तीचा बनाव रचला गेल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

मात्र, विद्यमान मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी कोणतीही ठोस कारवाई न करता, २३ मार्च २०२६ रोजीच्या सर्वसाधारण सभेत शेळके यांचा स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज मंजूर करून घेणारी टिप्पणी सादर केली. जिल्हाधिकारी कार्यालयाने या तक्रारीची दखल घेऊन मुख्याधिकाऱ्यांना या प्रकरणाचा सर्व रेकॉर्ड सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची सुनावणी सोमवार, १३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३:४५ वाजता जिल्हाधिकारी दालनात पार पडणार आहे.

या सुनावणीत आता मुख्याधिकाऱ्यांच्या भूमिकेवर काय निर्णय होतो आणि संबंधित ठराव रद्द होतो का, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## साई दर्शन रांगेतून साडे तीन तोळे सोन्याची चोरी, साई भक्त असुरक्षित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साई दर्शनासाठी देश-विदेश तून आलेल्या साई भक्तांना साई मंदिरात असुरक्षित असून साई समाधिच्या दर्शनासाठी जाताना दर्शन रांगेत तब्बल साडेतीन तोळे सोने चोरट्यांनी लंपास केल्याने संस्थांनच्या परिसरात साईभक्त असुरक्षित असल्याचे दिसून येत आहे.

एकीकडे मंदिरात येणारा प्रत्येक साई भक्त सुरक्षीत असल्याचा डांगोरा पिटणार्या संस्थान प्रशासनाचे सदर घटनेमुळे पितळ उघडे पडले असून भक्तांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दिनांक २६ मार्च रोजी दुपारी ११ वाजता जळगाव येथील साईभक्त स्मृती दिपक संगीत या आपल्या परिवारा सोबत सार्ई दर्शनासाठी आले असता दर्शन बारीत असताना गेट कमांक ३ येथे आले असता अज्ञात चोरट्यांनी त्यांचे गळ्यातील २५ ग्रॅम वजनाचे मंगळसुत्र व १० ग्रॅम ची चैन लंपास केली.

काही वेळाने त्यांचे हा प्रकार लक्षात आला असता त्यांनी शिर्डी पोलीस ठाण्यात धाव घेत गुन्हा दाखल केला आहे.

**कुठे आहेत आपली ए आय यंत्रणा?**

साईबाबा संस्थाने मोठा गाजावाजा करत आता दर्शन बारीत चोरांना नो एंट्री अशी घोषणा करत अत्याधुनिक ए आय यंत्रणेचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते त्या कार्यप्रणालीचे उद्घाटन केले होते . लाखो रुपये खर्चून जर ती प्रणाली काम देत नसेल तरती यंत्रणा राबवण्याची काय कामाची?साई भक्त जर सुरक्षित नसेल तर आपले संरक्षण विभाग नेमके करते तरी काय असा प्रश्न निर्माण झाला आहे . कार्यालयात बसून थातूर मातूर वस्तू सापडल्याचे फोटो टाकून चमकोगिरी करणाऱ्यांना ही घटना डोळ्यात अंजन घालणारी आहे .

## श्रीरामपूर, बेलापुर येथे पहाटे गारवा आणि दुपारी रखरखते ऊन

### तीव्र उकाड्यापासून नागरिकांना काही काळ दिलासा

**शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : श्रीरामपूर सह तालुक्यातील काही गावात किमान तापमानात मागील काही दिवसांपासून वाढ नोंदली गेली आहे. मात्र सोमवारी किमान तापमानात रविवारच्या तुलनेत तीन वर्षांनी घट नोंदली गेली. यामुळे मागील काही दिवसांच्या तुलनेत श्रीरामपूर शहर आणि ग्रामीण भागातील बेलापूर पढेगाव भेर्डापूर मालुन्जा वाकडी निमगाव खैरी अशा काही भागात पहाटे काहीसा गारवा अनुभवायला मिळतो आहे.

सध्या सर्वत्र रात्रीच्या वेळी गार वारे वाहत असल्याने दुपारच्या रखरखत्या उन्हातून नागरिकांना दिलासा मिळत आहे. राज्यात पावसाळी हवामानाचा प्रभाव कमी झाला असून सध्या वाऱ्यांचा वेग अधिक आहे. उत्तरेकडून येणारे वारेही जोमाने वाहत असल्याने राज्यातील अनेक भागातील तापमानात काहीशी घट नोंदवली गेली आहे. दरम्यान राज्यात पुढील तीन दिवस ही स्थिती कायम राहील अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तीव्र उकाड्यापासून नागरिकांना काही काळ दिलासा मिळाला असला तरीही पुढील तीन दिवसात कमाल तापमानात दोन ते तीन अंशांनी वाढ होईल, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. पश्चिमी वादळ परिणामामुळे वाऱ्यांच्या वेगातही वाढ झाली आहे तसेच उत्तरेकडून वारे वाहत आहेत यामुळे किमान तापमानात घट झाली असून ही स्थिती तात्पुरती असल्याचे हवामान विभागा कडून सांगण्यात आले. दरम्यान दुपारी रखरखत्या उन्हात शहरासह ग्रामीण भागातील रस्ते ओस पडलेले दिसत आहेत. सध्या किरकोळ स्वरूपात लग्नसराईचा हंगाम सुरू झाला आहे. यासाठी देखील डोक्याला उपरणे पाणी बरोबर पाण्याची बाटली घेऊन काहीजण लग्न समारंभाला हजेरी लावीत आहेत.

इतर रस्त्यांपेक्षा डांबरी रस्त्यांचे ऊन हे अतिशय कडक असते. डांबराच्या रस्त्यांच्या झळा तोंडाला लागू नये यासाठी पुरुष मंडळी उपरणे बांधत आहेत. रात्री गारवा असल्यामुळे घरातील फॅन चा देखील स्पीड हा कमी करावा लागत असल्याचे चित्र आहे. घरातील एसी चा वापर सध्या काही अंशी बंद अवस्थेत असल्याचे दिसत आहे.

## भरधाव डंपर घरात घुसला; वृद्ध महिला गंभीर जखमी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : घुलेवाडी ते समनापूर मार्गावरील सुकेवाडी शिवारात मंगळवारी सकाळी एक भीषण अपघात घडला. भरधाव वेगाने येणाऱ्या डंपरवरील चालकाचा ताबा सुटल्याने डंपर थेट रस्त्यालगतच्या शेतातून जात घरात घुसला.

या अपघातात सत्यभामा लहानू सातपुते (वय ७०) या वृद्ध महिलेला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, घुलेवाडीहून समनापूरकडे जाणारा (चक १७-६८४७) क्रमांकाचा डंपर अचानक अनियंत्रित झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या पपईच्या शेतातून वेगाने पुढे गेले आणि सुकेवाडी येथील रामनाथ लहानू सातपुते यांच्या शेतातील घरावर जोरदार धडक दिली. या धडकेत घराची भिंत कोसळून डंपर थेट घरात शिरला.

या वेळी घरासमोर बसलेल्या सत्यभामाबाई सातपुते या डंपरखाली सापडल्या. डंपर त्यांच्या हातावरून गेल्याने त्यांचा हात गंभीर जखमी झाला. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. मोठ्या प्रयत्नांनी महिलेला डंपरखालून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्यांना तातडीने 'मेडिकेव्हर' या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दरम्यान, अपघातानंतर डंपर चालक घटनास्थळावरून फरार झाला असून पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**ओव्हरलोड व भरधाव वाहनांचा धोका वाढतोय**

घुलेवाडी-समनापूर मार्गावर वाळू तस्करी, मुरूम वाहतूक करणारी ओव्हरलोड वाहने मोठ्या प्रमाणावर भरधाव वेगाने धावत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार केल्या जात आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अशा अपघातांची पुनरावृत्ती होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. यावर तातडीने कडक कारवाई करून नियंत्रण आणावे, अशी मागणी स्थानिकांकडून जोर धरत आहे.